म. ग्रं. सं. ठाणे
विषय - प्रवास
सं. नं.



REFBK-0008138

# कैलासाच्या कुशींत

मधुकर द. जोशी

# " कैळासाच्या कुशींत "

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
वाचनालय शाखा.

— लेखक —

मधुकर द. जोशी

REFBK-0008138

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
बा. क्र. ८१३८

पृष्ठें ) किंमत १२ आणे ( ४८

–मुद्रक–
**न. वा. लिमये**
प्रोप्रायटर, महाराष्ट्र मुद्रणालय,
टिळक रोड पुणें २

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

–प्रकाशक–
**बालकृष्ण पां. शालिग्राम**
५३८ बुधवार पेठ, पुणें २.
चिटणीस, प्राथमिक विद्यार्थि संघ, पुणें

# अनुक्रमणिका

| अ. न. | नांव | पृष्ठें |
|---|---|---|
| १ | आम्ही दिल्लींत | १ |
| २ | निसर्गाची माया | ३ |
| ३ | महान् दर्शन | ७ |
| ४ | निसर्गाच्या ंगल कार्यालयांत | १० |
| ५ | थोर विद्यालय | १५ |
| ६ | निसर्गाचा संदेश | १९ |
| ७ | कमखाना और गमखाना | २३ |
| ८ | जीवन–यात्रा | २८ |
| ९ | पायीं–प्रवास–सूचिपत्र | ३४ |

ॐ

# — समर्पण —

## कै. मातोश्री गोदूताईस



**आई,**

श्यामच्या आईनें श्यामचा जीवनवृक्ष निरनिराळ्या सद्‌गुणांनीं पल्लवीत केला. तद्वतच स्वावलंबन, स्वाध्याय, सत्य, सेवा, शालीनता इत्यादि सद्‌गुणरूपीं सरितांचे प्रवाह माझ्या जीवनगंगेंत ओतण्याकरितां तूं अहर्निश झटलीस, तुझें आशीर्वाद वांया कसें जातील ?

गेल्या मे महिन्यांत तूं मला सोडून गेलीस, आणि यावर्षीं मे महिन्यांत मी बद्रिकेदार ( हिमालय ) यात्रा पुरी केली. तुझा वर्ष–दिन वैशाख शु. नवमीस भागिरथीच्या पवित्र तीरावर उरकला. तुझ्या अस्थिहि भागिरथींत समर्पण केल्या, आणि तुझ्याच कृपेनें हें यात्रालेखन माझ्या हातून पार पडत आहे. वरील साऱ्या प्रेमळ स्मृति आज हृदयांत उचंबळत आहेत.

या साऱ्या स्मृतींना माझें हें पहिलें पुस्तक भक्तिभावनेनें समर्पण करीत आहे.

विजयादशमी
१७ ऑक्टोबर १९५३

तुझाच
**मधुकर**

# प्रस्तावना

—★—

भारताच्या उत्तरेस असलेल्या उत्तुंग व अनुल्लंघ्य अशा नगाधिराज हिमालयाचें आकर्षण अनादिकालापासून भारतीयांस वाटत आलेले आहे. भारतीयांची कित्येक यात्रास्थळें त्याच विभागांत आहेत आणि म्हणूनच जणूं कविकुलगुरु कालिदासानें त्यांस देवता पण म्हटलें आहे.



बद्रिकेदारच्या यात्रेचें वर्णन या छोटयाशा पुस्तकांत श्री. मधुकर जोशी यांनी केले आहे. प्रवासवर्णनाबरो-बरच भावी यात्रिकांना उपयोगी पडेल, अशी माहिती देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. पं. नेहरूंचे त्यांच्या कोठीवर जाऊन दर्शन घेतले, व पंडितजी फोटोकरितां लेखकाच्या आजीशेजारीं जाऊन उभे राहिले तो प्रसंग आपल्या आजीला चालवणार नाहीं, अशा कल्पनेनें कंडी करण्यास सांगत असतांना झालेला संवाद, तसेंच महाराष्ट्रीयांच्या चिकित्साखोर वृत्तीचा इतरांच्या मनावर होणारा परिणाम, लेखांना त्यांनी दिलेलें अध्यात्मिक वळण, निसर्गाचे घेतलेले महान् दर्शन आणि बद्रिकेदारयात्रा म्हणजे जीवन-यात्रा, अपूर्व गुरुदक्षिणा वगैरे वर्णनामुळें प्रवासवर्णनाबरोबरच अन्य गोष्टींचें दर्शनहि या पुस्तकांत घडतें.

कौन्सिलहॉल
पुणें
२४ सप्टेंबर १९५३

नाना कुंटे
२४–९–५३

# लेखकाचें निवेदन

---o---

बद्रि-केदार यात्रेच्या या पुस्तकाचा जन्म थोडयाफार हृदयंगम आणि स्फूर्तिजन्य परिस्थितींत झाला आहे. वाचकांना तो आकर्षक वाटेल म्हणून त्याची थोडी हकीकत खालीं देत आहे.

१९५१ च्या मे महिन्यांत माझ्या आईसह काशी, गया, प्रयाग, अयोध्या मथुरा, दिल्ली, आग्रा, हरद्वार, हृषिकेश आदि यात्रा करून आलों. या यात्रेंत आम्हांस सुमारें १। महिना लागला व त्यावेळीं आईनें इच्छा प्रदर्शित केली होती कीं, पुढीलवर्षीं आपण बद्रिनाथ, केदारनाथ यात्रा करूं !

पण 'ईश्वरी इच्छा बलियसी' ठरली आणि त्याच मे महिन्यांत माझी आई मला सोडून गेली. तिच्या संगतीमध्यें यात्रा करण्याचें माझें मनोरथ कोलमडून पडले, व त्याच विषण्ण मनस्थितींत १९५२ साल निघून गेलें.

१९५३ च्या मे महिन्याच्या प्रारंभीं अशी घटना घडून आली कीं माझी आई नसली, तरी माझी आजी बद्रिकेदारची यात्रा करण्यासाठीं निघाली. आईची इच्छा तिच्याबरोबर जाऊन मला पुरी करतां येण्यासारखी नसली तरी आईची भस्ममयी मूर्ति मजबरोबर बाळगून आणि भागिरथीचें स्नान सजीव स्वरुपांत आईला करतां येण्यासारखें नसले, तरी तिच्या अस्थि भागिरथींत विसर्जन करून एकप्रकारें आईची अपुरी इच्छा या प्रवासानें मी पुरी करूं शकेन या आशेनें मी आजीबरोबर प्रवासांस सिद्ध झालों.

सामानसुमानाची तयारी केली. आवश्यक वस्तु जमविल्या 'सर्वारम्भास्तण्डूला: प्रस्थमूला:' या उक्तीप्रमाणें पैशाचीहि सोय केली आणि १५ मे १९५३ रोजीं मुंबईहून बद्रिकेदार यात्रेसाठी प्रयाण केलें. मन आनंद आणि विषाद या दोन्ही भावनांनी, सुख आणि दुःख या संमिश्र विचारांनी नुसतें भरून गेलें होतें.

माझ्या आईच्या मनांत मजबरोबर ही यात्रा करण्यांत मला निसर्गाचें महान् दर्शन द्यावें, हिमालयाप्रमाणें उंच अनुभव मजसमोर ठेवावें, सोशिक-

पणा, स्वावलंबन, गुरुदक्षिणा इत्यादिकांचे घडे शिकवावे, सृष्टिकर्त्या परमेश्वराचें सत्यस्वरूप मी नीट जाणावें, आणि या रीतीनें जीवन समृद्ध व्हावें ीच इच्छा असणार !

आई नव्हती तरी आजीच्या पवित्र सान्निध्यांत मी वरीलपैकीं कांहीं गोष्टी अंशत: आचरूं शकलों. माझ्या उदार आईनें मीं जें शिकावें असें इच्छिलें तें निसर्गाच्या महान् दर्शनांतून मला घेतां आलें. आणि तेंच भू-मातेच्या अंकावर सर्व ठिकाणीं पसरलेल्या अनेक लेंकरांना द्यावें, हा या यात्रालेखनांतील माझा प्रमुख उद्देश आहे.

बद्रिकेदार यात्रेसंबंधीचे माझे लेख पुण्याच्या 'लोकशक्ती'च्या संपादकांनी पाहून त्यांची प्रशंसा केली, अधिक सविस्तर वर्णन द्या असें सांगितलें, जनतेस मार्गदर्शक होतील अशीं टिपणें द्या, असेंहि सुचविलें, त्यायोगें या पुस्तकास आजचें प्रस्तुत स्वरूप प्राप्त होऊं शकलें.

'लोकशक्ती'कारांनी हे लेख क्रमश: आठ अंकांत प्रसिध्द केले. सांगली येथील 'भारती' साप्ताहिकाच्या संपादिका यांनींहि तितक्याच आपुलकीनें त्यांना प्रसिद्धि दिली. माझ्या अनेक मित्रांनीं, हितचिंतकांनी आणि सुहृदांनीं लेखांत अमोलिक भर घालणाऱ्या सूचना पाठविल्या. हे लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावे असेंहि कळविलें त्याचेंच परिणत स्वरूप हें पुस्तक होय.

सर्वांच्या सहाय्याबद्दल मी त्यांचा शतश: ऋणि आहें. तरी विषेशत: कांहीं लोकांचीं नांवें लिहिल्यावाचून राहवत नाहीं. माझे जिवश्च मित्र श्री. बाळकृष्ण पां. शालिग्राम यांनीं या पुस्तकासाठीं फारच परिश्रम घेतले आहेत. या पुस्तकाचें प्रकाशक म्हणून त्यांनीं आपलेवर जबाबदारी घेतली, त्यांच्या आणि माझ्या स्नेहाला यावर्षींच एक तप पूर्ण होत आहे. असा हा सुयोग आहे. 'पुण्याच्या लोकशक्ति'चें संपादक व 'महाराष्ट्र मुद्रणालया'चे संचालक श्री. न. वा. लिमये यांनीं जर सहाय्य दिलें नसतें तर आज हें पुस्तक वाचकांच्या हातीं देण्याचा योग इतक्या लवकर आला नसता. माझे आजोबा कै. चिमणाजी हरि ठोंबरे यांचें स्नेही आणि सत्कार्य सेवासमाज, मुंबई या संस्थेचे उपाध्यक्ष श्री. स. आ. दांडेकर यांनीं माझे लेख वाचून, तपासून आणि योग्य त्या सूचना देऊन माझ्या पहिल्या या उपक्रमाला जो हातभार लावला ती त्यांची बहुमोल मदत मी कशी विसरेन. त्याचप्रमाणें

माळीनगरचे श्री. सोपानराव ग्यानबा भोंगळे, माझे गुरुजी श्री. अण्णासाहेब कोष्टी, व श्री. द. ज. नगरकर यांची मदतसुद्धां उल्लेखनीय अशीच आहे.

मुंबई विधानसभेचे सभापति नामदार डी. के. तथा नानासाहेब कुंटे यांनीं माझ्या छोटया पुस्तकाला प्रस्तावना मोठ्या आपुलकीनें आणि उत्साहानें देऊन मला प्रोत्साहन दिले. त्यांच्या अनेक कामांतून विधिमंडळ चालू असतांनादेखील त्यांनीं वेळ काढून मला जी छोटीशी प्रस्तावना दिली, त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानणें हें यथायोग्यच आहे.

जाणाऱ्या यात्रिकांना माझें हें पुस्तक मार्गदर्शक ठरेल अशी खात्री वाटते. जितकी जास्तींतजास्त माहिती मला मिळवितां आली, तितकी माहिती मी देण्याचा प्रयत्न केला आहे.


माझें हें पुस्तक पाहून माझ्या स्वर्गस्थ मातेच्या आत्म्यास आनंदच होत असेल. वाचकांनीं माझ्या या पुस्तकाकडे सहृदयतेनें पाहावें अशी नम्र विनंति आहे.

आपणां सर्वांचा विनीत

**मधुकर द. जोशी**

१३९ कसबा पेठ, पुणें २

विजयादशमी )
१७ ऑक्टोबर १९५३ )


श्री दत्तदिगंबर यात्रा कंपनी, पुणें.
श्री बद्रीकेदार यात्रा सहलीचा मार्ग.
दर्शविणारा नकाशा.
रामपुर
गुप्तकाशी
श्रीनगर
पौडी
गोपेश्वर
नंदप्रयाग
पीपल कोटी
गरुड गंगा
पांडुकेश्वर
विष्णुप्रयाग
हरद्वार
कोटद्वार
मुरादाबाद
शाहजहांपुर
बनारस (काशी)
मोगलसराय
अलाहाबाद (प्रयाग)
मथुरा
आग्रा
झांसी
भोपाळ
इटारसी
नासिक
मुंबई
पुणें
रेल्वे मार्ग
मोटारमार्ग
पायदल मार्ग

# श्री बद्री, केदार यात्रा

## श्री बद्रीनाथ जी की स्तुति

पवन मन्द सुगन्ध शीतल, हेम मन्दिर शोभितम् ।
निकट गङ्गा बहत निर्मल, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम् ।
शेष सुमिरन करत निशिदिन, धरत ध्यान महेश्वरम् ।
श्री वेद ब्रह्मा करत स्तुति, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम् ।
शक्ति-गौरि गणेश शारद, नारदमुनि मुच्चारणम् ।
योग ध्यान अपार लीला, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम् ।
इन्द्र चन्द्र कुवेर दिनकर, धूप दीप प्रकासितम् ।
सिद्ध मुनिजन करत जय-जय, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम् ।
यक्ष किन्नर करत कौतुक, ज्ञान गन्धर्व प्रकाशितम् ।
श्रीलक्ष्मी कमला चंवर डोलै, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम् ।
श्री बद्रीनाथ की पढ़त स्तुति, होत पाप विनाशनम् ।
कोटि तीर्थ भयो पुण्य, प्राप्त यह फलदायकम् ।।

# श्री सद्गुरु सांईबाबांचीं वचनें

( १ )

शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ।।

( २ )

माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हें हरेल सर्व त्याचें ।।

( ३ )

जरी हें शरीर गेलों मी टाकून । तरी मी धांवेन भक्तासाठीं ।।

( ४ )

नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुध्दी माझ्या ठायीं ।।

( ५ )

नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवें ।।

( ६ )

शरण मज आला, आणि वाया गेला । दाखवा दाखला ऐसा कोणी ।।

( ७ )

जो जो, मज भजे जैशा जैशा भावें; । तैसा तैसा, पावे, मीही त्यांसी ।।

( ८ )

तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हें अन्यथा वचन माझें ।।

( ९ )

जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस । मागें जें जें त्यास तें तें लाभे ।।

( १० )

माझा जो जाहला कायावाचा मनीं । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ।।

( ११ )

सांई म्हणे तोचि; तोचि झाला धन्य; । झाला जो अनन्य
माझ्या पायीं ।।

# केवळ बद्रिनारायण

---

केदारनाथहून बद्रिनारायणांस जाणें याबद्दलचा सर्व उल्लेख मागील भागांत आहे, पण पुष्कळजण पायीं प्रवास कमी पडावा, खर्च कमी लागावा, आणि हिमालयांत गेल्याचें पुण्य मिळावें. बद्रिनाथचेंच फक्त दर्शन घेण्यासाठीं ते जातात, केदारनाथास जात नाहींत, अशा केवळ बद्रिनारायणास जाणाऱ्या लोकांसाठीं कांहीं माहिती देणें आवश्यक आहे, म्हणून ती मी थोडक्यांत देत आहे.

हृषिकेशहून बद्रिनाथ १६९ मैल आहे. केदारनाथला जातांना रुद्रप्रयागपर्यन्तच मोटारनें जावें लागतें व नंतर पायीं प्रवास सुरू होतो. पण बद्रिनाथाला जातांना पिपलकोटीपर्यन्त मोटार जाते, आणि तेथून फक्त ३९ मैल बद्रिनाथपुरी आहे. म्हणजे,

| | |
|---|---|
| पीपलकोटी ते बद्रिनाथ | अंतर ३९ मैल |
| बद्रिनाथ ते वसुधारा | अंतर १२ मैल ( जाऊन येऊन) |
| बद्रिनाथ ते पीपलकोटी | अंतर ३९ मैल ( परतीचें ) |
| एकूण पायीं प्रवास | ९० मैल |

एवढाच पायीं प्रवास घडतो वाटेंत, कर्ण याग, नंदप्रयाग, शिवानंदी, चमोली मार्गे मोटार पीपकोटीपर्यन्त जाते, व तेथून पुढें पायीं प्रवास गरुडगंगा, पाताळगंगा, जोशीमठ, विष्णुप्रयाग, पांडुकेश्वर यावरून बद्रिनाथपुरीस जातां येते.

पायीं प्रवास सूचिपत्रांत सर्व चट्टयांचीं नांवें व त्यांतील अंतर दिलें आहे. त्याचा उपयोग करावा.

---

८१३८

# —लेखांक पहिला—

## आम्ही दिल्लींत

प्रत्येकाच्या आयुष्यांत चिरकाल स्थायी होणाऱ्या घटना घडत असतातच ! मग त्या दुखःद असोत व आनंददायी असोत, मनांत नुसते स्मरण झालें तरी काय वाटते ? हे ज्याचे त्यांनीच पडताळून पाहावें.

केदारनाथ-बद्रिनाथ यात्रेसाठीं आम्ही निघालो होतो. १५ मे रोजीं मुंबई सोडून आमचा दोन दिवस दिल्लीला 'महाराष्ट्र स्नेहसंवर्धक समाजांत' मुक्काम होता. माझ्याबरोबर ७४ वर्षांची माझी आजी होती. तिनं पारतंत्र्यातली दिल्ली पाहिली होती. 'माझें भाग्य मोठें म्हणून मला स्वतंत्र भारताची दिल्ली पाहण्यांस मिळाली' असें आजी मला वेळोवेळीं म्हणत होती. माझी ही दिल्लीत तिसरी खेप होती. पण आजीच्या उत्साहामुळें मलाही पण उत्साह वाटत होता. आम्ही फक्त लालकिल्ला, राजघाट आणि राष्ट्रपति भवन या तीनच गोष्टी पाहिल्या ! त्या पाहण्यांतसुद्धां वैशिष्टय होते. कारण आजीला त्या नवीनच होत्या. पारतंत्र्यांत राष्ट्रपतींच्या बंगल्याभोंवतीं आणि लालकिल्ल्याच्या आसपास जाण्याससुद्धां परवानगी नव्हती, म्हणून त्या गोष्टी तिनें पाहिल्या नव्हत्या आणि राजघाट म्हणजे राष्ट्रपित्याची समाधि ! या गोष्टी पाहतांना आजीच्या मनांत बरेंच मोठे विचार येत होते. अभिमान वाटत होता हे मी तिच्या चेहऱ्यावरून अगदीं स्पष्टपणें जाणूं शकलो !

"पंडित नेहरूंना मला पाहाता येईल कारे ?" 'त्यांचेकडे आपल्याला जाऊं देतील कारे !' आजी मला टांग्यांत विचारीत होती. उद्या आपण जाऊं अगदीं नक्की जाऊं ! ते आपणांस नक्कीच भेटतील, अशी आशा मी मनाशीं बांधून आजीला उत्तर दिलें होते.

१८ मे १९५३ ( सोमवार ) रोजीं सकाळींच ७॥ वाजतां सर्व आटोपून टांगा करून पंडितजींच्या बंगल्याच्या मार्गाकडे निघालो. टांगा जसजसा पुढें जात होता, तसतसा मनांत विचार येत होता कीं, आपण जातो आहोत खरे, पण निराशा पदरीं तर येणार नाहीं ना ? आपणांस आंत सोडतील काय ? त्यांना जवळून पाहतां येईल काय ? असे अनेक प्रश्न डोळ्यासमोर नाचत होते. बंगल्यापर्यन्त जाण्यास आम्हांस ८ वाजून गेले होते. बंगल्यासमोरील बागेंत आम्हीं थांबलो. थोडया अवधींतच तेथील गृहस्थानें तुम्हांस काय हवे ? तुमची काय तक्रार आहे, म्हणून विचारले. 'आमची तक्रार वगैरे कांहीं नाहीं. आम्हांस फक्त पंडितजींचे दर्शन घ्यावयाचे आहे म्हणून आम्ही आलो आहोत असें मी त्यांना सांगितले. पंडितजींच्याकडे तक्रारी घेऊन येणारे लोकसुद्धां पुष्कळ असतात हे मी ताडले ! पंधरा ते वीस मिनिटांच्या अवधी-नंतर आम्हांस आंत सोडण्यांत आले. आमचेबरोबर इतरहि दोन-चार दर्शन घेऊं इच्छिणारी माणसें आली होती. बंगल्यांत ऑफिसमध्यें आम्हांस बसवि-ण्यांत आले. पंडितजी ९। वाजतां बाहेर जाण्यासाठीं निघणार होते. ५।१० मिनिटांतच ते येतील असें आम्हांस त्यांचे चिटणीसानें सांगितलें व भेटण्याचे खोलींत आम्हांस नेऊन बसविले. मनांत कल्पनांचें काहूर माजलें होते. आपण मनांत इच्छा आणतो काय ? आणि त्यांच्या बंगल्यांतसुद्धां येतो काय ? इतक्यांत पंडितजी आले.

आम्ही उभे राहिलो. आजी तर सारखीच उभी होती. ती म्हणाली होती कीं, त्यांचे दर्शन घेतल्याशिवाय बसणारच नाहीं.

पंडितजी अगदीं जवळ उभे होते. 'कोठून आलांत' म्हणून आम्हांस प्रश्न विचारला. मी त्यांना अगदीं थोडक्यांतच उत्तरें दिली. हृदय अगदीं उचं-बळून आले होते. आजीला त्यांनीं 'माताजी' या नांवानें संबोधून हास्य-वदनानें 'क्या चाहिये' म्हणून विचारले. आजीच्या डोळ्यांतून तर आनंदा-श्रूंचा वर्षाव होत होता. तिच्याच्यानें बोलावेना, तिनें नमस्कार करून हातानेंच कांहीं नको म्हणून सांगितलें. ते हंसले ! काय तो योग ! कोठ-ल्याहि महाराष्ट्रीयाला अभिमानच वाटला पाहिजे. 'माझी आपला फोटो काढण्याची इच्छा आहे,' असा प्रश्न मी विचारला. तो माझ्याहिपेक्षां दुप्पट जोमानें होकार देऊन 'हा चलो' म्हणून मला सांगितले. 'माताजीकोभी

बुलाव ' हे पण त्यांनीं तितक्याच उत्साहानें मला सांगितले. ते दारांत जाऊन उभे राहिलें, आजी दाराच्या कडेला उभी होती. आजी पंडितजींपासून एक हात बाजूला उभी होती, तो ते तिच्याजवळ जाऊन उभे राहिले. डोळ्याची पापणी लवते न लवते इतक्या अवधींत मी तो फोटो घेतला. बाहेर उभ्या असलेल्या मोटारींत बसून पंडितजी आपल्या कामाला निघून बाहेर गेले. जातांनासुद्धां हंसतमुखानें हातानें खुणा करीतच ते मोटारीत जाऊन बसलें ! काय हा उत्साह, मी तर अगदीं आश्चर्यचकितच होऊन गेलो. आतापर्यंत पंडितजींच्याबद्दल अनेक उत्साहाच्या गोष्टी ऐकत होतो. पण आज मात्र मी त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

खरोखरच हा दिवस माझ्या स्मरणांतून कधीही पुसला जाणार नाहीं. भारताचे पंतप्रधान असूनही अगदीं आपल्या घरचेच कोणीतरी आले आहे अशा भावनेनें ते प्रत्येकाशी बोलतात, प्रत्येकाला भेटतात. त्यांच्या मनांत, सारा भारत हेच आपले घर आहे, त्यांतला नागरिक हा एक माझ्या सारखाच मानव आहे. ' मी जनतेच्या प्रेमामुळें अधिकारावर गेलो आहे ' ही भावना सदैव त्यांचेपाशी जागृत आहे. म्हणून ते केव्हांही आणि कोणासही भेटूं शकतात.

# —लेखक दुसरा—

## निसर्गाची माया

पंडित जवाहरलाल नेहरू यांची भेट झाल्यापासून मनाला एक प्रकारचा नवीनच तजेला आला होता. ' आम्ही महाराष्ट्रीय ' तर आहोंतच ! आणि ' आम्ही भारतीय ' आहोंत ही भावना अधिक दृढतर होऊन आमच्या सर्वांच्या मनांत अभिमानाचे एक नवीनच रोप लावले गेले. वास्तविक ही भावना नवीन नाहीं, पण पुष्कळांच्या हृदयपटावरून ती पुसली गेलेली दिसते. १८ मे रोजीं रात्रीं हरद्वारला जाण्यासाठीं आम्ही दिल्लीहून निघालो.

सकाळी हरद्वारला प्रवेश करतांना फारच आल्हाद वाटत होता. या ठिकाणाहून यात्रेस आरंभ होतो. हरद्वारला ' गंगाद्वार, मायाक्षेत्र ' या नांवानें संबोधिले जाते. गंगेचे विशाल पात्र, गंगेचे गायिले जाणारें माहात्म्य, गंगोत्रीस जाण्याचा रस्ता येथूनच सुरू होतो म्हणून याला गंगाद्वार नांव आहे. ' निर्सगाची माया ' येथूनच सुरू होते. जो जो पुढें जावे तो तो निसर्गाचे अधिक रमणीय दर्शन होते. कोठे भीति वाटते तर कोठे विलक्षण आनंद होतो. सर्व प्रकारचा आनंद निर्सर्गापासून उपभोगण्यास मिळतो पण तशी पाहण्याची दृष्टि पाहिजे, म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वररूपी निसर्ग तूं स्वतःच परमेश्वर आहेस हे पटवून देतो. स्वामी रामकृष्ण परमहंसांना या ठिकाणीच आत्मसाक्षात्कार झाला! अशी अवर्णनीय ' निर्सगाची माया पाहाण्यास सापडते. गंगेची प्रार्थना करून आम्ही दुपारीच हृषिकेशकडे प्रयाण केले.

हरद्वारहून ऋषिकेश १६ मैलांवर आहे. पायी प्रवासासाठीं उपयुक्त वस्तूची खरेदी केली. श्रीभरतजींचे दर्शन घेतले. ओझेवाला ( कुली ) या ठिकाणींच केल्यानें फार सोयीचे पडते, म्हणून तोहीपण ' दुर्गा कुली कंपनींतून ' केला. लक्ष्मण झूला, स्वर्गाश्रम आदि ठिकाणें पाहून आलो. दुसरे दिवशी सकाळीच देवप्रयागला जावयाचे होते म्हणून आगाऊ रिझर्वेशन करून ठेवले. वैशाख शुद्ध सप्तमीला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. श्री. बाबा कालीकमलीवाले यांचे पंचायत क्षेत्र या ठिकाणीं आहे. साधू-बैरागी यांना अन्नछत्र चालू असते व यात्रिकांची जागेची सोयपण मोठ्या प्रमाणांत या ठिकाणीं होते. मी त्यांच्या मॅनेजरकडून पुढील सोयीसाठीं चिठ्ठी घेतली. सकाळी पांच वाजतां देवप्रयागला मोटार जाणार होती. रात्री लवकरच आम्ही झोपी गेलो.

आतां आमची 'अखिल भारतीय' यात्रा सुरू झाली होती. साऱ्या भारतांतून आलेले भारतीय आमचे सोबती होते. निरनिराळ्या भाषा व पेहराव दृष्टोत्पत्तीस येत होते. पुढील मोटार वाहतूक एकेरी असल्यामुळें सर्व मोटारी एकदम सुटणार होत्या. मोटारस्टँडवर गर्दी बरीच होती. मला एक ' महाराष्ट्रीय गृहस्थ ' भेटले व त्यानीं चौकशी करून आधी तिकिटे आणून दिली. ते त्या ठिकाणी पोलिस इन्स्पेक्टर होते. ' महाराष्ट्रीयाला महा-

राष्ट्रीयांबद्दल आत्मीयता वाटतें ' याचेच ते उदाहरण आहे. त्यांची ओळख नसतांना त्यांनींहून आम्हांस सर्व माहिती सांगितली. मोटारी सुटल्या. आणि त्या सरकारी दवाखान्यापुढें उभ्या राहिल्या. सर्व यात्रिकांना सक्तीने कॉलऱ्याची ( हैजेका टिका ) टोचण्यांत आली. ' झाले ! आता त्रासांस सुरुवात झाली ' आजी म्हणाली. तिनें आत्तापर्यंतच्या आयुष्यांत कधीही टोचून घेतले नव्हते. वाटेच्या प्रवासांत निरनिराळ्या प्रकारच्या अन्नपाण्याच्या विकारापासून बचाव व्हावा यासाठींच सक्ति करून टोचतात. जे आपल्याच फायद्याचें आहे ते आपण मान्य केले पाहिजे. आपणहून मोठ्या आनंदाने टोचून घेतले पाहिजे वगैरे वगैरे मी बडबडलो. पण मनांतून काय होत होते ते माझे मीच जाणे ! आजीची समजूत काढण्यासाठीं मला बोलावें लागलें एवढेंच. एवढें सर्व होईपर्यंत सात वाजून गेले होते. पोलिसांच्या शिट्टीचा आवाज आला. 'गेट छूट गया' म्हणून त्यानें आवाज दिल्याबरोबर मोटारी निघाल्या. एका बाजूला गंगेचे खोलवर दिसणारे पात्र आणि एका बाजूला उंच पहाड आणि रस्ता अगदी लहान यामुळें मोटार चांगलीच हेलकावे खात होती. पहाडांस चिटकून जात असल्यामुळें हात वगैरे बाहेर काढण्याची सोयच नव्हती. मन भीतियुक्त झाले होते. आजीनें तर कांहींवेळा डोळेच झाकून घेतले.

११॥ वाजतां देवप्रयाग आले. कडक ऊन्ह पडलें होते, अंगातून घामाच्या धारा वहात होत्या. हात बधिर झाल्यामुळें तो चांगलाच दुखत होता. अशा स्थितीत गावांत प्रवेश केला. अलकनंदा व भागिरथी यांच्या रमणीय संगमावर हे गांव वसले आहे. विजेशिवाय सर्व सोयी देवप्रयागला पाहण्यास मिळाल्या. या ठिकाणी श्री रघुनाथजीचे विशाल मंदीर आहे. संगमावर हरिकुंडात स्नानादि कर्मे आटोपलीं. त्या बर्फाच्या गार पाण्यामुळें हाताचा बधिरपणा नाहीसा होऊन अंगात जोम, उत्साह निर्माण झाला. भागिरथी नदीलाच येथून पुढें गंगा हे नांव प्राप्त झाले आहे. भगिरथानें प्रयत्न करून आणलेली भागिरथी ती हीच आहे. फारच जोरांत आवाज करून ती दगडावर, खडकावर आपटत आदळत वाहात असते. तिचा तो जोर पाहून मन कंपायमान होते पण विलक्षण आनंद होतो आणि मनःशांतीही मिळते. अलकनंदा आणि भागिरथी या दोघींच्या पात्रावर झुलते

पूल आहेत. अलकनंदेच्या किनाऱ्या-किनाऱ्याकडून केदारनाथ-बद्रिनाथकडे रस्ता जातो आणि दुसरा भागिरथीच्या उजव्या कडेने गंगोत्री यमुनोत्रीकडे जातो. देवप्रयागाला एक दिवस मुक्काम करून दुसरें दिवशीं सकाळीं कीर्ति-नगरला निघालो. देवप्रयाग येथे केदारनाथ, बद्रिनाथला जाऊन आलेली कांहीं महाराष्ट्रीय मंडळी भेटली. आम्ही सारेजण अगदीं औत्सुक्यानें त्यांना माहिती विचारण्यासाठीं गेलो. त्यांनींहि पण तितक्याच औत्सुक्यानें आम्हांस सारे सांगितले.

कीर्तिनगरला आम्ही १२ वाजतां पोहोचलो. कीर्तिनगरपासून श्रीनगर हे तीन मैलावर आहे. वाटेंत अलकनंदा नदीचा 'झुलता पूल' ओलांडून पायी तीन फर्लांग जावें लागते. झुलता पूल म्हणजे नदीच्या पात्रावरून पली-कडे जाण्याकरतां नदीवर, दोरखंडें अगर जाड तारा यांच्या सहाय्यानें तयार केलेला पूल होय. हा नदीच्या पात्रांत दगड-सिमेंटच्या कमानी बांधून तयार केलेला नसतो. या पुलावरून प्रवासी चालू लागला कीं, तो हेलकावे घेतो; म्हणूनच याला "झुलता पूल" म्हणतात. व त्या ठिकाणीं दुसऱ्या मोटारी उभ्या असतात. आतापर्यन्त आम्ही टिहरी जिल्ह्यांत होतो, पण आतां गढवाल जिल्ह्यांत प्रवेश केला होता. वाटेंत श्रीकमलेश्वराचे प्राचीन मंदीर लागते. या कमलेश्वराची तपश्चर्या भीमानें केली होती असें सांगतात. श्रीनगरला आम्ही बाबाकाली कमलीवाले यांचे धर्मशाळेंत उतरलो. आमची चांगलीच सोय या ठिकाणीं झाली. येथेही पण एक दिवस मुक्काम केला. या ठिकाणी जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांचा संगम झाला असल्यामुळें गांव अगदीं गजबजून गेला होता. दुसरे दिवशी सकाळी आम्ही रुद्रप्रयागांस जाण्यासाठीं निघणार होतो. आणि आमचा मोटार प्रवास संपून पायी प्रवास सुरू होणार होता. रुद्रप्रयागापासून केदारनाथ ४८ मैल आहे. व त्रियुगी नारायणासह ५४ मैल आहे. मोटारचा प्रवास संपवून आतां लवकरच पायी प्रवासास सुरुवात होणार होती.

# —लेखांक तिसरा—

## महान् दर्शन

२२ मे रोजी सकाळीं १० वाजतां आम्हीं रुद्रप्रयागास आलो. या ठिकाणीं मंदाकिनी आणि अलकनंदा यांचा संगम होतो. दोन्ही नद्या, अगदी जोरानें वहात येऊन एकमेकांना कडकडून भेटतात. जशा कांहीं साताजन्मानंतर भेटत आहेत असें दिसतें. येथे रुद्रेश्वराचें मोठें प्राचीन मंदीर आहे दोन्ही बाजूनें नद्या वाहात येऊन एकमेकीस भेटतात, त्यांचा तो आवाज ऐकून मात्र निसर्गानें रुद्रावतारच धारण केला कीं काय असे वाटते. दुपारी जेवणें आटोपून श्री. केदारनाथाचें ध्यान करून हिमालयाचें स्मरण करून पायी प्रवासास आरंभ केला.

प्रत्येकाच्या पायांत कॅनव्हासचे बूट होते, व हातांत एक काठी अशा या सर्वसाधारण वस्तु प्रत्येकाजवळ होत्या. पहिले एक-दोन मैल सरळच वाटले पण नंतर चढावास सुरुवात झाली. ऊन कडक पडले होते. पहिलाच दिवस असल्यामुळें चालण्यांत उत्साह मोठा होता. असाच उत्साह शेवटपर्यन्त टिकावा म्हणून आम्ही घाई वगैरे न करतां सावकाश चालत होतो. मधून मधून ' हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे, हरे, कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ' हे नामस्मरण सुरूं होते. अितक्यांत ढगांचा गडगडाट सुरूं झाला. आणि पावसाची मोठी सर आली. आम्ही पहाडाच्या एका कपारीत उभे राहिलो. पण पाऊस थांबेना म्हणून परत चालूं लागलो. आम्ही श्री केदारनाथाच्या' महान् दर्शनास ' जात होतो. तेव्हा निसर्गानेंच आम्हांस स्नान घालून पवित्र केले, पण असाच जर रोज पाऊस यावयास लागला तर कसे काय होईल याची काळजी वाटूं लागली. आम्ही सारेजण भिजलेलेच होतो, तसेंच चालत होतो, आणि निसर्गाचे महान् दर्शन ' घेत होतो. लगेच परत ऊन पडले, मनाची शंका दूर झाली. आधी ढगांचा गडगडाट होऊन पाऊस पडून आम्ही भिजलो आणि नंतर, परत ऊन पडले ही तास–दीड

तासाची घटना म्हणजे फार मोठी विलक्षण अशी वाटली. आमच्या मनामध्यें शंकांचा फारच गडगडाट चालला होता. त्यांवर भीतीचें ढग निर्माण होऊन आम्ही एकमेकांत निसर्गाची ही स्थिति आपणांस मानवेल कीं नाहीं यावर चर्चा करीत होतो, तोंच सूर्यनारायणानें सर्वांच्या हृदयावर आपला प्रकाश टाकून आपले 'महान् दर्शन' देऊन मनाला स्थिरता आणि आत्मविश्वास निर्माण करून दिला. आमचे कपडे ओले झाले होते; ते सुकले आणि आमची मनें चिंताग्रस्त झाली होती तीही निसर्गानें थोडचाच अवधींत आनंदित केली आणि म्हणून ही घटना मी विलक्षण मानतो.

दरमजल दरकोस करीत करीत २१ मैल चालून निरनिराळें लहान मोठें पहाड ओलांडीत आम्ही २४ तारखेस गुप्तकाशीला आलो. या ठिकाणीं शंकर गुप्तस्थितींत राहतात. कुंडांत स्नान केले, आजीनें गुप्तदान पण केले आणि त्याच वेळीं मला तिनें मोती, पोळे, एका सोन्याच्या तारेंत गुंफलेले दाखविले, आणि सांगितले कीं 'यदाकदाचित् मी जर मेले, तर माझ्या तोंडांत हें घालण्यास विसरूं नकोस' 'हे या डबीत ठेवले आहे' तिचे हे बोलणें ऐकून मला धक्काच बसला. पण म्हाताऱ्या माणसाच्या दूर दृष्टीचो कल्पनाही पण तितक्यांत चटदिशी आली आणि 'मरणाचे स्मरण असावे,' या दासबोधांतील समर्थांच्या उक्तीची, व 'मरण हे कांहीं आपल्या हातांत नाहीं' या गोष्टीची आठवण आजीनें करून दिली. आम्ही दररोज सकाळी ५ वाजतांच चालण्यास आरंभ करीत होतो ते १०–१०॥ पर्यंत ६-७ मैल चालणे व्हावयाचे. नंतर स्नान, भोजन, व थोडी विश्रांति घेऊन ३॥ च्या सुमारांस परत चालण्यास सुरवात करावयाची ! सबंध दिवसांत ११–१२ मैल तरी चाललें म्हणजे २५–२६ -दिवसामध्यें आपला पायीं प्रवास आटोपतां येतो.

प्रत्येक ३–३ मैलांवर चटया असतात, त्याठिकाणी सारी सोय असते. आतां आमचा मुक्काम गौरीकुंड चट्टीवर होता. याठिकाणीं गरम पाण्याचे कुंड आहे. या गरम पाण्याच्या कुंडापासून फक्त २० फुटाच्या अंतरावरच नदी वाहते. पाणी इतके गार कीं बोटसुद्धां घालवत नाहीं. आत्तापर्यंत चालून चालून आलेला सारा शीण त्या गरम पाण्यानें नाहींसा केला. आणि अंगांत एक नवीन उत्साह निर्माण केला. येथून ७ मैल, केदारनाथ

आहे, आणि सारा चढच आहे, सकाळी आम्हीं निघालो. थंडी अधिक भासत होती, पण मन प्रसन्न असें वाटत होते. कारण परमेश्वराचे द्वार जवळ जवळ येत होतें. जिकडे पाहावे तिकडे बर्फाचे थर पसरलेले दिसत होतें, जणू काय दर्शनाला जाणाऱ्या लोकांचे स्वागत नगाधिराज आपल्या या अलोभनीय सौंदर्यानें करीत होता. या बर्फाच्या थरावर पडलेले ऊन पाहून चांदीच्या पत्र्यांनीच सारा डोंगर मढविला आहे कीं काय असें वाटत होते. आणि तो धवल हिमगिरी पाहून आपलें मनहि असेंच ' धवल ' करून माझें दर्शन घ्या असें सांगत होता. जसजसे आम्ही चढ चढत होतो, तसतशी मनाची आतुरता अधिक अधिक वाढत होती. सात मैलाचा चढ चढून आम्हीं अगदीं थकून गेलो होतो . दुपारीं १२॥ वाजतां आम्ही केदारनाथाचे द्वारी प्रवेश केला. थंडीनें तर अंग अगदीं बधीर होऊन गेले होते. बाबाकाली कमलींवाले यांच्या धर्मशाळेंत आम्ही उतरलो. आजीनें आम्हा सर्वांना आधीं दर्शन घ्या मग पडा असें सांगून ती निघालीसुद्धां ! आणि आम्ही केदारनाथजींचें ते पहिले महान् दर्शन घेतले. निसर्गाचे महान् दर्शन घेत घेत आम्हीं या स्थानीं आलो होतो. सारे श्रम क्षणभर नाहिंसे झाल्यासारखे वाटून मन प्रफुल्लित झाले. दुपारी कसें तरी जेवण करून झोपलों, थंडीने कांहींच सुचत नव्हते. बाबाकाली कमलीवाले या संस्थेचे मॅनेजर श्री. शांतानंद सरस्वती ऊर्फ दिक्षित हे महाराष्ट्रीय गृहस्थ भेटले. त्यांनीं तर आमची चांगलीच सोय केली, गरम पांघरूणें दिलीं, शेगड्या दिल्या. सारी माहिती दिली, आणि त्यांनीं त्याबरोबरच एक मोठी गोष्ट सांगितली कीं, माणूस आपल्या घरांत असतो, त्यावेळीं ही माझी खोली, हा माझा दिवाणखाना म्हणून सांगतो. पण आळीत गेल्यावर ते माझे घर पहा म्हणून सांगतो. आणि परप्रांतांत आल्यावर आम्ही महाराष्ट्रीय आहोत म्हणून सांगतो. परदेशांत गेला तर तो आम्ही भारतीय आहोत म्हणून सांगतो. यातून काय दिसते कीं जसजसे दूर जावें तसतशी माणसाची दृष्टीही विशाल होत जाते, विशाल मन निर्माण होते. हे माझे, हे तुझे, ही मनाची वृत्ति लय पावून त्या ठिकाणी अशा या विशाल वृत्तीचा पाया तयार होतो. ' हे विश्वचि माझे घर ' ही भावना निर्माण होते, म्हणून हे स्थान आणि दर्शन ' महान् ' होय !

केदारनाथाचें पूजन अर्चन दुसरे दिवशी दुपारीं १२ वाजतांच संपवून केदारनाथाला परत लवकर तुझ्याकडे आण ही आशा व्यक्त करून आणि वंदन करून निघालो. सकाळीं १२ ते १ वाजेपर्यंत कडकडून ऊन पडतें. आणि निसर्गाचा चमत्कार म्हणजे लगेच पाऊस अगर बर्फ पडण्यास सुरवात होते. केदारनाथ हे स्थान समुद्रसपाटीपासून ११,७५० फूट उंचीवर आहे.

दीड दिवसच आमचा मुक्काम केदारनाथला होता, पण त्या अवधींत निसर्ग आणि परमेश्वरी साक्षात्कार यांचा संगम झालेला आम्हांस पहाण्यास सांपडलें. मनाला जो अमूप व सात्विक आनंद झाला होता, त्याचे वर्णन करणे तरी शक्य आहे काय ?

सायंकाळीं गौरीकुंडास मुक्काम केला होता. दुसरे दिवशीं सकाळीं चालण्यास प्रारंभ केला, आतां आम्हास 'त्रियुगी नारायणास जावयाचे होतें. केदारनाथाचें दर्शन घेतल्यापासून समाधान मिळाले होतें. त्याच जोरावर अनेक चढउतार आम्हीं सारेजण चढत आणि उतरत होतो. त्या केदारनाथाच्या 'महान दर्शनाने' आणि निसर्गाच्या 'महान् दर्शनाने' आम्ही पवित्र झालो होतो, 'जय केदारनाथ की जय हो' असें पुकार करीत एकमेकांना (जाणाऱ्या-येणाऱ्या) यात्रिकांना नमस्कार करीत रस्ता काटीत होता.

## —लेखांक चवथा—

## निसर्गाच्या मंगल कार्यालयांत

केदारनाथाच्या दर्शनानें आणि त्याबरोबरच निसर्गानें दिलेल्या 'महान् दर्शनानें' आम्ही पुनीत झालो होतो. अभिमानाचा समूळ नाश पावून त्या ठिकाणी, दया, क्षमा, शांती यांचा शिरकाव झाला होता. जे योग्यालासुद्धा लवकर मिळणार नाहीं, ते निसर्गानें आम्हांस फार लवकर प्राप्त करून दिले होते, पण ते किती दिवस टिकेल याची मात्र शंका आहे. पण अशा या

महान प्रतापी निसर्गापाशी जर कायम वास्तव्य मिळेल तर मात्र दुसरी कोठलीही मानवी शक्ति अगर मानवी वासना मानवास ह्या अवस्थेंतून च्युत करूं शकणार नाहीं, अितकी मोठी भावना निसर्ग मानवी मनावर आणू शकतो, आणि ‘ तू स्वतःच परमेश्वर आहेस ’ हे आपल्या त्या ‘ महान दर्शनानें दाखवू शकतो. ज्याचेजवळ अितकी मोठी शक्ति आहे, तो परमेश्वररूपी निसर्ग प्रत्येक वेळीं नाविन्य, आणि आपली माया का दाखवूं शकणार नाहीं ? विचार आणि दृष्टी मात्र विशाल असली पाहिजे !

## शिवपार्वतीचा लाजाहोम

अशा या थोर भावनेनें आम्ही प्रेरित झालो होतो याचा प्रत्यक्ष. म्हणजे प्रत्येकाच्या वागण्यांत, बोलण्यांत, चांगलाच फरक झालेला माझ्या अनुभवास आला. आमचा मुक्काम ‘ त्रियुगी नारायण ’ या पवित्र ठिकाणी होता. गिरीराज हिमालयात शिव–पार्वतीचा विवाह या ठिकाणीं आपला होता. लग्नासाठी आपणसुद्धां ‘ मंगल कार्यालय ’ पाहतो, तर मग हे ‘ निसर्गाचे मंगल कार्यालय ’ या ठिकाणी कोणती उणीव असणार ? निसर्गानें सारे कांहीं असलेले आपले सौंदर्य या ठिकाणीं ओतलें होते. रस्त्यांत निरनिराळ्या प्रकारचे सुगंध दरवळत होते. फळे, फुले, आदि गोष्टींना तर वाणच नव्हता. दर्भापासून ते आंब्यापर्यन्तची सर्व प्रकारची झाडे होती. अशा या महान् भूमीवर शंकरानें पाणिग्रहण केलें होते.––या ठिकाणी तो शिवपार्वतीच्या लग्नाप्रसंगी पेटविलेला ‘ लाजाहोम ’ अजून पेटत ठेवलेला आहे. त्याचेही पण दर्शन घेतलें आणि त्यांत हवन आम्हीं केले. या ठिकाणीं ब्रह्मकुंड, रुद्रकुंड, सरस्वतीकुंड, विष्णुकुंड आहेत. एकांत आचमन, एकांत स्नान, तर एकांत तर्पण आणि एकांत दान हीं कार्यें केली जातात. याहि ठिकाणी बाबाकाली कमलीवाले यांची धर्मशाळा आहे. तेथेंच आम्हीं विसावा घेतला आणि मोठ्या जड पावलानें ‘ त्रियुगी नारायणाहून ’ पुढच्या ठिकाणासाठीं प्रयाण केले.

## मंदाकिनी नदीवरील झुलता पूल

३० मे रोजी आम्ही ‘ उखीमठ ’ या ठिकाणावर पोहोचलो. मंदाकिनी नदीचा मोठा झुलता पूल पार केल्यावर १॥ मैल चढ चढल्यावर हे स्थान येते. या ठिकाणीं उत्तम बाजारपेठ आहे. केदारनाथाची सहा महिने या

१.५.७३

ठिकाणीं पूजा होते. केदारनाथाची गादी या ठिकाणीं आहे. शिवाय ओंकार, मांधाता आणि उषा देवीचें आणि 'केदारनाथाचे विशाल मंदीर आहे. अखिल भारतीय यात्रेतील हे एक प्रमुख स्थान आहे. सरकारी दवाखाना, उत्तराखंड विद्यापीठ, संस्कृत पाठशाला या ठिकाणीं आहेत. थोडीफार खरेदी करून ज्या वस्तूंची उणीव भासत होती, त्यांची भर करून आम्ही उखी-मठावरून मुक्काम हलविला आणि चढ-उँतार, चढत-उतरत, तुंगनाथाच्या रस्त्याला लागलो. आमच्या सर्व प्रवासांतील सर्वात उंचावर हे स्थान आहे. दोनच मैल उंच पहाड चढावयाचा होता, पण बराच वेळ लागला. थंडी फारच पडली होती, आणि आम्ही चालत होतो. चढ फार म्हणून आजीच्या मागें 'कंडीवाले' लागले होते, आणि मीही पण आजीला म्हणालो, 'फार उंच आहे, तुझ्यानें चालवणार नाहीं, कंडीवाले आहेत, एवढ्यापुरती तरी कं ी कर!' पण आजीनें मला उलट अगदीं जोमानें सांगितले कीं, 'अरे मी ज्यासाठीं आले आहे, आणि ज्याच्याकडे चालले आहे, तो मला घेऊन जाण्यास समर्थ आहे, तोच माझा 'कंडीवाला' आहे. मी आपला गप्प बसलो. तुंगनाथावर आम्हीं सर्वजण दुपारी ११ वाजतां पोहोचलो. चौफेर दृष्टी टाकली तों सारे विश्व खाली दिसत होते. बर्फाचे डोंगर चमचम करीत होते. या ठिकाणाहून सारी ठिकाणें दिसतात. सबंध उत्तराखंडातील मोठी ठिकाणें येथून दिसतात. अंघोळ आटोपून तुंगनाथाचे दर्शन घेतले. नंतर जेवणे आटोपून थंडी बरीच असल्या मुळें आम्ही उतरावयास सुरुवात केली. अितके खाली उतरत होतो तरी उतार संपतच नव्हता. पाताळांत चाललो की काय! असा मनाला क्षणभर भास झाला. अितके खालीं आम्हीं उतरत होतो. जीवनाचें चक्र हे असेंच आहे. प्रत्येकाला हे अनुभवण्यांस मिळते. मानव कितीही उच्च ठिकाणी गेला तरी तो तेथून खाली निश्चित येतो. पण सत्कृत्यें, सद्भावना मनांत असेल, तर तो जरी कितीही खाली आला, तरी तो श्रेष्ठच मानला जातो. अभिमानाच्या ताव्यांत राहून जे खाली आले, ते खालीच आले, आणि पश्चांतापास पात्र झाले. पण ज्यांनीं सत्कार्ये केली ते जरी त्या ठिकाणाहून खाली आले तरी-सुद्धा ते उच्चच गणले गेले. हे सारे त्या निसर्गानें शिकविले. 'निसर्गाच्या मंगल कार्यालयांत' सारें कांहीं आहे. ज्याचे त्याने ते निवडून आत्मसात केलें पाहिजे.

## परशुरामाचे मंदीर

'निसर्गाच्या मंगल कार्यालयांत' जी कांहीं स्थानें आहेत, त्यांतच गोपेश्वर हे स्थान आहे. या ठिकाणीं श्री परशुरामाचे मंदीर आहे, आणि ज्या परशूनें त्या परशुरामाने एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रीय केली तो महान् परशु पण या ठिकाणीं ठेवलेला आहे. त्याचे मी अगदीं बारकाईनें निरीक्षण करून दर्शन घेतलें. पित्याच्या आज्ञेवरून आपल्या मातेचा नाश करणाऱ्या पितृवचनी परशुरामाची गोष्ट मला आठवली. आणि आजीनें मला 'ते झालेले पाप परशुरामाला पुढील अवतारांत भोगणें प्राप्त झाले हे सांगितलें' रामावतारांत त्याच आईने कैकयी बनून रामाला चौदा वर्षे वनवासास पाठविले. 'जे देवादिकांस भोगावे लागले, त्यांनाहि पण चुकले नाहीं, ते काय आपणास चुकवितां येणार आहे.' 'चांगले करावें, चांगले भोगावे, वाईट केले कीं फळें वाईटच येणार. ईश्वर कांहीं करत नाहीं, सारे तूं तुझ्याच बुद्धीनें करीत असतोस, मात्र चांगले झाले कीं स्वतः केले म्हणून मिरवतोस आणि वाईट झाले कीं ईश्वराला एवढेंसुध्दां पाहावले नाहीं म्हणून त्यालाच दोष देतोस अशी ही मानववृत्ति आजीनें मला चांगलीच पटवून दिली. म्हाताऱ्या माणसाची किंमत फार मोठी आहे. आपण त्यांना विशेष कळत नाहीं, म्हणून समजतो पण त्यांचेजवळ सारे आहे, ते फक्त आपण घेतलें पाहिजे. हें सारे ज्ञान मला 'निसर्गांच्या मंगल कार्यालयांतच' मिळालें. याच दृष्टीनें निसर्गाकडे काय, परमेश्वराकडे काय, अगर स्वतःकडे पाहिल्यास आत्मसाक्षात्कार ताबडतोब झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

## बद्रीनाथ पुरीपासून ५ मैलांवर

आतां आमचा मुक्काम अलकनंदेच्या डाव्या तीरावर वसलेल्या चमोलीस होता. याही ठिकाणीं बराच मोठा व्यापार चालतो. येथून पुढें नऊ मैलावर असलेल्या पीपलकोटीपर्यंत मोटारीनें जातां येतें. पण एवढें सर्व आम्हीं चालत होतो आणि नऊ मैलासाठीं मोटार करावयाची नाहीं असा निश्चय करून पायींच पीपलकोटीला आलो. या ठिकाणी अत्यंत गर्दी होती. जातांना मोटारीसाठीं खोळंबा होऊं नये म्हणून नक्की दिवस ठरवून परतीची मोटारीची तिकिटें आम्ही आगाऊच रिझर्व करून ठेवली. व तसेंच पुढें निघालो. पाताळगंगा, गरुडगंडा आदि ठिकाणीं मुक्काम करीत करीत आम्ही जोशी

मठावर येऊन पोहोचलो. श्रीमत् जगद्‌गुरु श्री. शंकराचार्य यांचे जे चार मठ प्रसिद्ध आहेत, त्यापैकींच एक ' जोशी मठ ' आहे. या ठिकाणी श्री. बद्रिनाथाची गादी आहे. सहा महिने शीतकालात बद्रिनाथाची पूजा या ठिकाणींच होतें. अितरही देवांची मंदिरें या ठिकाणीं आहेत. उजव्या हाता-कडील मार्ग ' भविष्य-बद्रि या ठिकाणीं जातो, दुसरा आदि बद्रिनाथाकडे जातो. याठिकाणीं जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांची बरीच गर्दी दिसत होती. येथून दोन मैल उतारावर विष्णु प्रयाग आहे. येथे अलकनंदा आणि धोली गंगा यांचा फारच रमणीय व चित्तथरारक असा संगम आहे. पुढें आम्ही पांडुकेश्वर येथें आलो.

येथें पांडवांच्या हयातींत बांधलेले योगबद्रि भगवान् श्री बद्रिनाथाचे एक प्राचीन मंदिर आहे. येथें दीन, दुबळे लोक बरेच दिसले, पण ते सारे तेजस्वी वाटले जरी कांही मिळत नव्हते, तरी मनावर प्रसन्न छाया स्पष्ट दिसत होती. एकानें तर ' आम्ही जगण्यासाठीं भीक मागतो, खाण्यासाठीं नाहीं ' हें सांगितले. साऱ्या प्रकारचे लोक आम्हांस भेटत होते. निसर्गाच्या मंगल कार्यालयांत ' साऱ्यांना स्थान आहे. कोणीहि यावे, जे चांगले आहे, त्यांची लूट करावी आणि आपले ज्ञान, वैराग्य, विशाल दृष्टीची वाढ करून घ्यावी, तो कोणालाही मनाई करत नाहीं. आतां आम्ही श्री बद्रिनाथाच्या पायथ्याशीं येऊन पोहोचलो होतो. हनुमान चट्टीपासून ५ मैलावर श्री बद्रिनाथपुरी आहे. आता मात्र आम्हांस दर्शनाची ओढ लागली होती, निसर्गाच्या मंगल कार्यालयातील प्रमुख ठेवा म्हणजेच श्री बद्रिनाथाचें दर्शन घेण्याची ओढ! हीच एक भावना मनांत होतीं. आम्ही सकाळीं निघा ो.

# —लेखांक पांचवा—

## थोर विद्यालय

निसर्गाच्या मंगल कार्यालयांतील महान् ठेवा म्हणजेच श्री. बद्रिनाथाचें दर्शन ! त्या दर्शनाची ओढ आम्हां सर्वांना लागली होती आणि कां लागू नये ? योग्याला वाटते मी समाधीच्या पूर्णावस्थेंत जाऊन परब्रह्मांत मिसळावे, भगवद्‌भक्ताला वाटतें सायुज्य मुक्ति मिळावी ! जो ज्या मार्गावर असेल त्याला त्यांतील आनंद प्राप्त व्हावा अशी अिच्छा आणि त्यांसाठींच सारी खटपट, प्रयत्न आणि भक्ति ! आम्ही निसर्गाचे महान् दर्शन घेत होतोच, पण त्याची पूर्तता या बद्रिनाथाच्या दर्शनानें होणार होती.

### अनुभवाचे हिमालय

हनुमान चट्टीवरून आम्ही सकाळींच निघालो. हवेंत थंडावा अधिक भासत होता. रस्ता साधारण चढाचाच आहे. पण अति थंडाव्यामुळें चालण्यास प्रोत्साहन नव्हते. तरीसुद्धां मनाच्या ओढीमुळें आम्ही रस्ता काटीतच होतो. जाणारे येणारे यात्रिक ' जय बद्रि विशाल कीं ' म्हणून बद्रिनाथाच्या नांवाचा जयघोष करीत होते. आम्हीहि पण त्यांना साथ देत होतो. तासाभरानें श्री सूर्यनारायणानें प्रकाश टाकून आम्हा सर्वांची मनें प्रफुल्लित केली. जीवनाचे हें असेंच आहे. जीवनाची वाटचाल करीत असतांनासुद्धां मन उदास होते. पण त्यानें डगमगून न जातां अशावेळींहि सद्‌भाव, भक्ति, आणि समाधान जवळ बाळगलें तर एक दिवस तरी असा येतो कीं जीवनांत समाधानरूपी सूर्यप्रकाश टाकून मनांत शांति देतो. निसर्गापासून मी हेच शिकलो, मोठमोठी शिखरे आणि हे मोठमोठे हिमालयांतील विभाग म्हणजे अनुभवाचे हिमालय आहेत. मानवाला त्या ठिकाणीं या गोष्टींचे असें शिक्षण मिळावें, अशी त्या निसर्गानें सोय केली आहे; आणि ते आपोआपच मिळन मानवी मनाची उन्नति होते. सभोंवताली दृष्टि टाकली तो, मला बर्फमय शिखरें दिसत होती. पाणीसुध्दां त्या बर्फाच्या थराखालून वाहत होते. ते एक ' निसर्गाचे विद्यालयच ' मला वाटलें. या ठिकाणीं सारे नैसर्गिक आहे.

## गरम पाण्याचें कुंड

११ वाजतां या महान निसर्गाच्या तपोभूमीवर आम्ही प्रवेश केला. या ठिकाणी महाविष्णु तपासाठीं बसले आहेत, आणि आसपास साऱ्या विश्वातील देव, तेहेतीस कोटी देव, तपाला बसले आहेत. 'देवांनासुद्धां देवपण टिकविण्यासाठीं तपश्चर्या करावी लागते.' त्या पवित्रस्थानीं आम्ही पोचलो होतो. मला तर कांहीं निराळे वाटत होते. बाबा काली कमलीवाले यांच्या आश्रमांत आमचे निवासस्थान होते. आतां स्नान करून दर्शन घ्यावयाचें म्हणून गरम पाण्याच्या कुंडीवर आम्ही आलो. तें मोठें कुंड आणि त्यामधून निघणाऱ्या वाफा पाहून क्षणभर मन स्तंभित झाले. त्या गरम पाण्याच्या आंघोळीनें अंगांत एक नवचैतन्यच खेळूं लागलें. निसर्गाच्या विद्यालयांत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं निसर्गानें ही खास सोय केली आहे. त्या पाण्यानें आमचें बाह्यांग स्वच्छ तर केलेच पण अंतरंग निर्मळ कशानें होणार ? त्यासाठीं कोणतें पाणी पाहिजे ? कोणता साबण पाहिजे ? असे पुष्कळजण विचारतात. कोणी म्हणतात त्याला अश्रूंचे सिंचन करून शुद्ध करावे ! कोणी म्हणतात पश्चात्तापरूपी साबणानें तें स्वच्छ करावे ! पण निसर्गानें तर एकदमच बाह्यांग आणि अंतरंग निर्म करून टाकले. एवढी मोठी शक्ति फक्त त्याचेजवळच आहे. त्या शक्तीचा अनुभव आम्हा सर्वांना आला.

'बद्रि विशाल की जय ! गरूड भगवानकी जय ! सच्चे दरबारकी जय ! या घोषणा त्या महाद्वारीं चालल्या होत्या. त्या आवाजांत आम्ही आमचे आवाज मिसळले. आमचे आवाजसुद्धां बदलले होते, मनांत बदल झाला कीं साऱ्या शरीरांत बदल घडून येतो. चांगले विचार, सत्कार्य यांची कास मन धरावयास लागले कीं शरीरांतील इंद्रियें पण त्याच रस्त्याच्या मार्गाला येतात. असा हा बदल निसर्ग घडवून आणतो. यापेक्षां आणखी थोर असा कोणता गुरू मिळणार आहे ! 'थोर विद्यालयांत,' गुरुही थोरच असणार. अठरा फूट लांबूनच श्री ब्रद्रिविशालाचे दर्शन होते. तें लांबचे दर्शनसुद्धा समाधानकार असेंच असतें, कारण निसर्ग हा आपले दर्शन जवळून देतो, आणि मनाची वृत्ति अशी एकाग्र करतो कीं जणूं कांहीं गेलेला प्रत्येक यात्रिक 'विश्वरूप दर्शन घेत असतो.' जें दर्शन अर्जुनानें

घेतले, यशोदेनें श्रीकृष्णाच्या मुखांत पाहिले, त्यापेक्षांही अधिक आनंददायी असें हे विश्वरूप दर्शन प्रत्यक्ष निसर्गरूपी गुरु आपल्या या ' थोर विद्यालयांत देतो. त्याचेजवळ भेदभाव नाहीं. फक्त ज्याच्याजवळ शुद्ध अंतःकरण आहे– आणि विशालदृष्टि आहे, त्याला हा गुरू उपदेश देऊन हे ' महान् दर्शन ' देतोच ! आमचा मुक्काम या अशा तपोभूमीवर तीन दिवस होता. साऱ्या सुखसोयी या ठिकाणीं होत्या. कोणत्याहि गोष्टीची उणीव याठिकाणीं नव्हती. एकदां का या विद्यालयाशीं, काया वाचा मनें तद्रूप झालांत कीं सारें मिळेल ! आणि आत्मसाक्षात्कार तर ताबडतोब होईल म्हणूनच हें 'थोर विद्यालय !'

## वसुधारेस भेट

दुसरे दिवशीं आम्ही ' वसुधारा ' पाहावयास गेलो. ४०० फूट उंचीवरून खालीं पाणी पडते. त्याचा तो आवाज आणि दृष्य फारच आल्हादकारक असून, निसर्गाच्या अस्तित्वाची साक्ष पटवून देणारे आहे. रस्ता बर्फांतून आहे. जातांना येतांना सारे यात्रिक अत्यंत काळजीपूर्वक आपले पाय टाकीत असतात. यावरून निसर्ग दाखवून देतो कीं तुम्ही या विद्यालयांतून लवकरच परत जाणार आहांत. पुढच्या जीवनक्रमांतसुद्धां अत्यंत काळजीपूर्वक प्रत्येक गोष्ट करा. त्यामुळेंच आनंद निर्माण करूं शकाल, आणि त्या आनंदापासून तुम्ही तर आनंद भोगू शकालच, पण इतरही त्या आनंदानें आनंदून तुम्हांस हा आनंद निर्माण करण्यास कोणी शिकविले म्हणून विचारतील. मात्र त्यावेळी माझी आठवण तुम्हांस निश्चित झाल्यावाचून राहाणार नाहीं. लहानशा गोष्टीवरूनसुद्धा हा गुरु आयुष्यांतील केवढे मोठे प्रश्न सोडवूं शकतो ? असें हे ' थोर विद्यालय ' आहे.

## अपूर्व ' गुरुदक्षिणा '

आतां आम्ही परत निघणार होतो, पण त्याआधीं त्या पाण्यानें स्नान करावे म्हणून आम्हीं कुंडावर आलो. वारा जोराचा सुटला होता. स्नानासाठीं आम्हो तयार झालो होतो. खिशांत साध्या पाकिटांत जवळजवळ ११० रुपये होते. म्हणून मी हातांत शर्ट घेऊन उभा होतो. जोराच्या वाऱ्यानें तो हातातील शर्ट सहजगत्या उडाला व खाली वाहाणाऱ्या नदीत फेकला गेला. माझे मन थरारून गेले. तो शर्ट दिसेनासाहि झाला;

पाण्याच्या वेगापुढें काय टिकणार? क्षणार्धांत झालेली ही घटना, पण माझें मन अगदीं बावरून गेलें. आतां काय करायचे; विचारांनी मन गांगरून गेले. तशाच स्थितींत मी त्या गरम पाण्यानें अंघोळ करून आलो. पुष्कळ गोष्टी निसर्गाच्या थोर विद्यालयांत मी पाहिल्या, पण आतां माझी खरीच परीक्षा त्या गुरूनें घेतली होती. पण लगेच त्या शर्टामागें वहात जाणाऱ्या मनाला आवरून घेतले आणि आपण ही 'गुरुदक्षिणा' दिली आहे. ज्या 'थोर विद्यालयांत' मला अनेक गोष्टी शिकता आल्या, अनेक तऱ्हेचे अनुभव अनुभविले, त्यामानानें आपणहून माझ्या हातून घेतली गेलेली ही 'गुरुदक्षिणा' फारच कमी होती असें माझे मलाच वाटत होते. आणि मी माझ्या मनःची समजूत करून घेत होतो. आजीही पण तेंच म्हणाली.

'गेल्याचा शोक वृथा न करावा, वित्त सर्व जायाचें, वित्ताची काय कथा, शाश्वत टिकणें नसेंच कायाचे," जे होते तें सारे चांगल्यासाठींच होते. जरी चांगले झाले तरी त्याबद्दल फार आनंद मानूं नये. जरी दुःख, अगर वाईट घटना घडली तरी त्याबद्दल फार दुःखही करत बसूं नये ' फुलून जाऊं नये सुखामध्यें दुःखी अधीर होऊं नये ' ही गोष्ट माझ्या मनावर आणि इतर बरोबरच्या लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं या 'थोर विद्यालयांतील उपाध्यायानें ही घटना मुद्दामच घडवून आणली असला पाहिजे! जीवनांतल्या खाचाखोंचा आणि येणाऱ्या संकटांना तोंड कसें द्यावयाचें याचा मार्ग जर प्रत्यक्ष अनुभवावयाचा असेल तर आपण या निसर्गाच्या 'थोर विद्यालयाचा' विद्यार्थी बनले पाहिजे. अितर व्यावहारिक आणि ऐहिक पदवी मिळवून काय काय साध्य करतां येतें आणि आले आहे हे आपण पुष्कळांच्या उदाहरणावरून पाहूं शकतो.

पण या 'थोर विद्यालया' चे पदवीधर साऱ्या विश्वांत, आपल्या सत्कार्यांच्या जोरावर आपले कार्य मोठ्या अभिमानानें आणि नेटानें करूं शकतात. स्वामी विवेकानंद हे एक फार मोठे असे 'या थोर विद्यालया' चे पदवीधर होते. ते 'थोर विद्यालय' नुसते पाहून जरी आलो तरीसुद्धां आपल्याला फार थोर असा आनंद प्राप्त झाल्याशिवाय रहाणार नाहीं. म्हणूनच तो श्रेष्ठ बद्रिविशाल! आणि ती बद्रि-केदारची यात्रा! ज्या यात्रेमुळें जीवनयात्रा सफल कशी करावीं असें ज्ञान, शिक्षण, अनुभव

मिळतो ती थोर यात्रा आणि त्या ठिकाणीं निसर्गानें निर्माण केलेले ते 'थोर विद्यालय ' आहे, असे म्हटल्यास तें वावगें होणार नाही.

### घरची ओढ: १९ मैलांची मजल

एकादशीचे दिवशीं आम्ही दर्शन घेऊन निघालो. परत निघालो असलो तरी आतां मात्र आनंदच वाटत होता. ज्यासाठीं आम्हीं एवढा प्रवास केला, तें आम्हास मिळाले होते. ते म्हणजे त्या बद्रिविशालाच्या 'थोर विद्यालयां'-तील दर्शन हें होय ! आम्ही त्या दिवशीं सकाळपासून चालतच होतो. आमचा मुक्काम ' जोशी मठावर ' होता. एक दिवसांत सारेजण न कंटाळता १९ मैल चालत होतो. आमच्या पायीं प्रवासांत इतकी मोठी मजल आम्हीं प्रथम आजच घेतली होती. पुढें पीपलकोटीला पोंचण्यास अंतर अवघें १९ मैल उरले होतें. येथें पोंचल्यानंतर आम्हीं मोटारीनें प्रवास सुरू करणार होतो. आणि आगाऊ रिझर्वेशन करून ठेवले होते, म्हणून वेळेवर हजर राहाण्यास पाहिजे होते. जशी दर्शनाची ओढ लागली होती, त्याचप्रमाणे आपल्या घरची पण ओढ सर्वांना लागली होती.

## —लेखांक सहावा—

### निसर्गाचा संदेश

थोर विद्यालयांतील उपाध्यायाकडून आम्ही, आशिर्वाद घेऊन निघालों. ' जीवनांत आनंद निर्माण करा' हा एक मोठा संदेशच त्यांनीं आम्हांस दिला होता. प्रत्यक्ष अनुभव देऊन त्या गुरूनें आम्हां सर्वांना अगदीं चांगलें पटवून दिलें होतें. प्रत्येकाला त्याच्या बुद्धीनुसार कांहींतरी नवीन मिळालें असें वाटत होते. यात्रा कां करतात ? त्यापासून काय पुण्य मिळते वगैरे बाबतींत पुष्कळांच्या तोंडी हल्ली उहापोह चालू असतो. पापपुण्यांवर कोणी विश्वास ठेवण्यास तयार होत नाहींत. पण ही अखिल भारतीय यात्रा केल्या-

वर, त्यापासून मिळणारा अनुभव, निसर्गसुख आणि दृढ आत्मविश्वास, यावर सारे जीवन आपण कसें व्यतीत करावें हें प्रत्येक यात्रिक नक्कीच जाणूं शकतो ! आणि पाप–पुण्य काय ? हेही पण त्याबरोबरच जाणूं शकतो ! मानवाच्या खऱ्या कार्याची जाणीव, मानवाचे अस्तित्व ज्या ठिकाणीं प्रतीत होते ते ठिकाण स्वर्गाहून श्रेष्ठच ! म्हणून ही यात्रा श्रेष्ठ आणि म्हणूनच तो बद्रिविशाल श्रेष्ठ ! !

एकादशीचे दिवशीं आम्हीं एका दिवसांत १९ मैलांची मजल घेऊन जोशी मठावर आलो होतो. पण साऱ्या धर्मशाळा आणि चट्टया भरून गेल्या होत्या. चालून चालून कंटाळा तर आलाच होता. आणि भूकही फार लागली होती. आम्ही उपवास न करणाऱ्या मंडळींनीं पुरी–भाजी कांहीं मिळाली तर घेऊन खावयाची असें ठरविले. पण कोठेंच कांहीं मिळेना ! आणि रहाण्यास जागाही पण मिळेना. भाडे देण्यास आम्ही तयार होतो. तरीसुद्धां जागा मिळेना. तांदूळ, आटा, खरेदी करूनच फक्त जागा राहाण्यास मिळते, शिधा खरेदी केल्यावर जागा मोफत मिळतें, पण भाडे देऊन जागा लोक देत नाहींत. लोकांची प्रवृत्ति पैशाकडे नसून किमान धान्य खरेदी करून मग जागा घ्या, असें ते विनवितात ! तांदूळ, आटा जरा महाग मिळतो, पण त्या लोकांचे ते श्रम पाहून आणि इतक्या अवघड चढाच्या ठिकाणीं ते सोय करतात, त्यामानानें ती योग्यच किंमत आहे. कशी तरी निरवानिरव करून आम्हीं जागा मिळविली. महाराष्ट्रीयांबद्दल आपुलकी धरणारे लोक फार आहेत. बाल, पाल, लाल, त्यांतील बाल म्हणजे लोकमान्य टिळकांचा महाराष्ट्र म्हणून ओळखणारे पुष्कळच लोक दिसले व आदरानें विचारपूस पण करणारे अनेक भेटले. त्यांनासुद्धां महाराष्ट्राबद्दल अत्यंत अभिमान वाटतो, पण त्यांतील एकानें मात्र मला चांगलीच जाणीव करून दिली, आणि माझ्याही पण पुष्कळ वेळां दृष्टोत्पत्तीस अशी गोष्ट आली ती अशी कीं, महाराष्ट्रीयांच्या जवळ चिकित्सा आहे. चिकित्सा असावी ती केव्हांही चांगलीच गोष्ट आहे, पण कोठल्याही गोष्टीची चौकशी करताना, अगर खरेदी करताना, भांडखोर वृत्ति मोठ्या प्रमाणांत दिसून येते. अगदीं साध्या साध्या गोष्टीवरूनसुद्धां मी महाराष्ट्रीय आणि इतर यात्रिक यांच्यांत मारामाऱ्या झालेल्या पहिल्या. अशा गोष्टी केव्हांही लांछनास्पदच आहेत.

प्रत्येक गोष्ट आधी आपणाला मिळावी असा आग्रह नेहमीच धरून कसा चालेल? दुसऱ्याबद्दल सहानभूति, प्रेम हें दाखविल्याशिवाय दुसऱ्याकडून तरी चांगल्या वागणुकीची अपेक्षा कशी व्यक्त करावी? जसें मी चांगले काय हे लिहिले तसें दोषही पण अगदीं निर्भिडपणें नमूद केले आहेत. ज्या-ठिकाणीं साऱ्या भारतांतील यात्रेकरू जमतात, ज्या ठिकाणीं साऱ्यांची मनें एक होतात, ज्या ठिकाणी सारेजण खरोखरच एकदिलानें, आणि प्रेम-भावनेने आणि एकमेकांशीं आदरानें वागतात त्या ठिकाणीं जर आपली असली विचारसरणी आणि वागणूक दिसून आली तर कांहींतरी आपल्यांत अजून कमी आहे असें, खटकल्यावाचून राहात नाहीं. यालाही अपवाद असे महाराष्ट्रीय आहेत, पण सर्वसाधारणतः ही वस्तुस्थिति मी पाहिली. निसर्गा-कडून विशाल अंतःकरण बनले जाते. त्याचा उपयोग साऱ्या आयुष्यांत करून घेतां आला पाहिजे. मला श्री. दातार हे गृहस्थ भेटले, ते तिकडेच राहाण्यास गेले आहेत. त्यांनीं मला खरोखरच अगदी स्पष्टपणें ‘आपले चुकते कुठे’ हें दाखवून दिलें. आपली चूक निसर्गंहि दाखवून देतो. माणसानें माणसाच्या चुका दाखविल्या कीं त्याला राग येतो, त्याला त्याबद्दल अपमान वाटतो, पण निसर्ग मात्र मनुष्य तयार करतो. त्याच्यांत मानवता ओततो, आणि समता, ममता निर्माण करतो. हे ज्याला पाहावयाचे असेल त्यांनी जरूर या यात्रेला जावे!

नुसता प्रवास, अगर नुसतें दर्शन घेण्याच्या ओढीनें गेलेला यात्रिक, जीवन प्रवास कसा सुखावह करावा हे अनुभवितो, आणि प्राणाचें नियमन कसें करावे आणि आपल्या स्वतःत परमेश्वर कसा पहावा हे ज्ञान त्याला आपो-आप मिळतें पण त्याकडे पाहाण्याची दृष्टि पाहिजे! म्हणजे सारे मिळते. जोशी मठावर आम्हीं दुसरे दिवशीं निघालो. वाटेंत द्वारकेचें शंकराचार्य यांचेही पण दर्शन झाले, त्यांनी ‘First purify the mind from nature, then cultivate your life’ एवढेंच शब्द उच्चारलें व ते पुढें गेलें. फारच मोठा संदेश त्यांनीं आम्हांस दिला. निसर्गापासून मन शुद्ध केल्यावर त्या मनावर दुसरे कसलेंही आघात होऊं शकणार नाहीत. पाण्यांमध्यें होडी तरंगत असते, पण जर होडीत पाणी शिरले तर काय होईल? त्याचप्रमाणें देह हा संसारांत आणि बाहेरील वातावरणांत गुंतावा.

C93C

देहावर अघात झालें तरी त्यापासून मन हे अलिप्त असावें, मनावर त्याचा परिणाम होऊं देतां कामा नये, तो जर झाला तर ज्याप्रमाणें त्या होडींत पाणी शिरल्यावर ती बुडून जाईल, त्याचप्रमाणें मन त्या ऐहिक बाबींत अडलें तर मात्र त्यांतून मानवाला बाहेर पडून आपली आध्यात्मिक उन्नति करून घेणें दुरापास्त होईल. हेच तात्पर्य अगदीं थोडक्या शब्दांत त्यांनीं आम्हांस पटवून दिले. कुमार चट्टी, पाताळ गंगा, गरूड गंगा आदि ठिकाणीं मुक्काम करीत करीत आम्ही पीपलकोटीला आलो आणि आतां आम्ही आमचा पायी प्रवास समाप्त केला. दुसरे दिवशी मोटार मिळावयाची होती. जवळजवळ तीस हजार माणसें त्या मोटारीसाठीं खोळंबून राहिली होती. आम्ही आगावूंच तिकिटे रिझर्व केल्यामुळें आमचा खोळंबा होणार नव्हता, यामुळें आम्हांस फारच बरें वाटले. आठ-आठ दिवस लोक मोटारी साठीं पडून राहिले होते. आम्ही पुरुषमाणसे पटांगणांतल्या खडीवर झोपून रात्र काढली. कशीबशी दुपारी १ वाजतां आम्हांस मोटार मिळाली व रात्रीं आम्हीं श्रीनगरला आलो.

दुसरें दिवशी सकाळी कीर्तिनगरला आलो, आणि तेथून एकदम हृषिकेशला जावयाचें असें ठरवून आम्हीं कांहीं गुजराथी सहकारी गांठून एक सबंध मोटार रिझर्व केली. पण मोटारच वेळेवर आली नाहीं. आम्ही सबंध मोटार रिझर्व केल्यामुळें बाकीच्या मोटारी आधी गेल्या. २ तास आमची मोटार उशीरा आली,आणि एकेरी मार्ग (one way) असल्यामुळें आम्हांस थांबावे लागले. आमचा कांहींच इलाज चालत नव्हता. पायी प्रवास फारच सुखावह म्हणावयाचा. कोणावर विश्वासून बसावें लागत नव्हते. शेवटी संध्याकाळीं ६ वाजतां मोटार सुटली,आणि त्या रात्री आम्हीं देवप्रयागला मुक्काम केला. फारच रात्र झाल्यामुळें त्या अवघड रस्त्यांतून गाडी पुढें नेऊं नये, असें आम्हा सर्वांचे मत असल्यामुळें गाडी आम्ही थोपवून धरली. सकाळीं भागिरथी नदींत स्नान करून घेतले, परत योग केव्हां येईल ? कदाचित् असली मोठी यात्रा आयुष्यांत परत घडणारदेखील नाहीं. माणूस हा जसा फार आशावादी असतो, तद्वतच तो विचारीही असतो. आम्ही स्नान करून त्या पवित्र गंगेचें वारंवार स्मरण करून, त्या सूर्याला अर्घ्यप्रदान करून दिनांक १४-६-५३ रोजीं हृषिकेशला आलो. एक दिवस हृषिकेशला मुक्काम केला. हमालाचे

पैसे चुकते केले. त्याच्या त्या कष्टाची आठवण अजूनदेखील येतें. पायी जाणाऱ्या यात्रिकाला चालतांना हातांत एखादी पिशवी जरी असली तरी ती जड वाटते, तर मग दीड दीड मण ओझें घेऊन न कंटाळतां चालणारा तो हमाल पाहिला म्हणजे निसर्गानें त्याला दिलेल्या आणि प्रयत्नानें त्यानें टिकविलेल्या शक्तीची चांगलीच कल्पना येते.

१५ जून रोजीं आम्ही हरद्वारला आलो. आणि आमची बद्रिकेदारची यात्रा संपविली. मनाला मात्र परत एकदा त्या निसर्गाच्या मंगलकार्यालयांत जावे असें वारंवार वाटत होते. आम्ही जवळजवळ २२० मैलांचा पायीं प्रवास केला, अगदीं सहजगत्या केला. त्याबद्दल आमचें आम्हालांच आश्चर्य वाटू लागले. निसर्ग आपल्या मायेनें यात्रिकाला तन्मय करून आपलें दर्शन देतो, आणि तन्मयता प्राप्त झाली कीं, परमेश्वराचें अस्तित्व दिसू लागते.तें सारें या बद्रिविशालाच्या यात्रेंत आहे.अशी ती महान् यात्रा आम्ही पुरी केली. पुढील भागांत उपयुक्त गोष्टींची माहिती आणि जरूर त्या सूचना व माहिती देण्यांत येईल.

# —लेखांक सातवा—

## ' कमखाना और गमखाना '

कोठल्याही यात्रेस गेलेला यात्रिक यात्रेचें ठिकाण पाहण्यास जितका आतूर झालेला असतो, आणि सारे तो जितक्या आतुरतेनें पाहातो, त्याहिपेक्षां अधिक आतुरता आणि चाणाक्षता त्यानें प्रवासांत बाळगली पाहिजे. आणि विशेषत: अशा या लांबच्या प्रवासांत तर अत्यंत दक्षता आणि दूरदर्शीपणा बाळगल्याशिवाय प्रवास कधीही सुकर होत नाहीं. ' कमखाना और गमखाना ' ह्या गोष्टीकडे जर प्रत्येकजण आत्मीयतेनें पाहून जर ती अमलात आणील, तर त्या यात्रिकाला फार त्रास होणार नाही. कमी खाण्यानें

शरीरास त्रास न होता आरोग्य बिघडत नाहीं. पुष्कळजण जे आजारी पडतात त्याचें कारण जर शोधावयास लावले तर मुख्यत: त्यांच्या अनियमित आणि भरमसाठ खाण्यामुळेंच त्यांची तब्येत बिघडल्याचें आढळेल.खाणें अनियमित मिळाले तरी तें खाताना दोन घासानें कमी खाल्ले गेले, तर त्रास होत नाहीं हे जसें खाण्याचे, तसेंच दुसऱ्या प्रवासी मित्रांशी बोलतांना अगर त्यांच्याशी आपली वागणूक ठेवतांना; आपल्याजवळ सहानुभूतिदर्शक भाषण, त्यांचेविषयीं प्रेम, आपुलकी असेल, तर त्यापासून आपला प्रवास आनंददायी झाल्याशिवाय राहणार नाहीं. होणारा त्रास आणि दु:ख सहन करण्याची तयारी असली, त्याविषयीं खेद न मानतां नेहमीं आनंदी आणि समाधानी वृत्ति बाळगून समयसूचकता जवळ असली कीं प्रवास हा सुखकर होईल. प्रत्येक यात्रिकानें 'कमखान और गमखाना' ही म्हण जरूर आपल्या लक्षांत ठेवली पाहिजे ! त्याप्रमाणें आपलें आचरण प्रवासांत ठेवले पाहिजे. म्हणजे आपला प्रवास आणि आपल्या बरोबरीच्या दुसऱ्या प्रवाशांचा प्रवास, आपोआपच खेळीमेळीनें आणि आपुलकीनें झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

( १ ) बद्रिकेदारनाथ यात्रेला जाणाऱ्या यात्रिकांजवळ अतिशय अवजड असें सामान नसावें. जे अगदी जरुरीचें आहे असेंच सामान घ्यावे ! सामानाचे वजन साधारणत: प्रत्येक माणसी, २० ते २५ शेरापर्यन्त असावे. निघते वेळीं सामानाचें वजन जरूर करून घ्यावें म्हणजें हमाली फार पडत नाही. आणि पायीं प्रवासांत वाटेंत सामान काढून कमी करण्याची पाळी येणार नाहीं.

( २ ) ट्रंक अगर वळकटी यावर आपले नांव व पत्ता कधीही घालूं नका ! अितक्या लांबच्या प्रवासांत असें का नसावे, तर त्यावरचा नांव व पत्ता कांहीं फसवे व भामटे लोक लिहून घेतात व आपल्या घराकडे पैशाकरितां तार करून पैसे मागवून घेतात हें उदाहरण मी प्रत्यक्ष पाहिले आहे. फार तर गांवाचे नांव घालावे आणि आपल्या सामानाची जास्त काळजी घ्यावी. वास्तविक सामानावर नांव–पत्ता घालणें हें फायद्याचे आहे. पण या लांबच्या प्रवासांत मात्र फायद्याची गोष्ट आपल्यांच तोटयास कारणीभूत होते. म्हणून

या प्रवासांत तरी ही गोष्ट टाळावी.तिकडच्या कांहीं सेवाश्रमांतून या विषयीं मुद्दाम पाटचा लावून ठेवल्या आहेत. आणि या गोष्टी सहजगत्या होऊं शकतात.पैसे मागविणें, कांहीं वेळां अपघातांत मरण आले म्हणून तारा करणारी एक टोळी वावरत असते. त्यापासून बचाव व्हावा म्हणून मुद्दाम या गोष्टीकडे यात्रिकानें पाहावे.

या गोष्टी केवळ आपल्यासाठींच लागतील असें नाहीं, पण आपल्याबरोइतर जे कोणी यात्रेकरूं असतील आणि त्यांचेजवळ जर या गोष्टींचा अभाव असेल, तर त्यांना आपण मदत केली तर अशा या महान यात्रेंत सेवा करण्याची संधि मिळून पुण्यहि पण मिळते.

( ४ ) पायीं प्रवासांत जरी धान्य महाग मिळत असले, तरी धान्य खराब विकण्याचा दुकानदाराला अधिकार नाहीं. जर कोठें वाईट धान्य अगर दुर्गंधीयुक्त, सडलेली अथवा किडलेली वस्तू दिसली.तर,सॅनेटरी इन्स्पेक्टरला सांगून आपली तक्रार दूर करून घ्यावी.

( ५ ) सकाळीं ४॥ च्या सुमारास पायी प्रवासास सुरुवात करून १०-१०॥ पर्यन्त चालावे. नंतर लगेच अंघोळ न करतां, साधारण तासा-दीड तासानें अंघोळ करावी.

( ६ ) भोजनाचा शिधा खरेदी करतांना तो व्यवस्थित आहे किंवा नाहीं याची खात्री करून मग घ्यावा. आणि स्वयंपाकासाठीं मिळणारी भांडी परत नीट घासून घेवून स्वयंपाक करून नंतर स्वच्छ घासून परत करावी, म्हणजे दुकानदाराशीं भांडण्याची वेळ येत नाहीं.

( ७ ) दुपारी विश्रांती घेऊन ३॥ च्या सुमारास परत पायी प्रवासास सुरुवात करावी. तो सायंकाळीं ६—६॥ पर्यंत आपल्या ठिकाणीं पोचण्याची खबरदारी घ्यावी.

( ८ ) वाटेंत पुष्कळ ठिकाणी पाणी आढळतें. तेथील पाणी न पिता ज्या ठिकाणीं नळ आहेत अगर पाणी चांगलें असल्याबद्दलची खात्री होईल तेथें पाणी प्यावे.

( ९ ) स्नानाच्या वेळीं नदीवर आपल्या कपड्यापाशीं आपला माणूस उभा करावा. रात्री निजताना आपले सामान नीट आपल्याजवळ ठेवून

त्याचें रक्षण होण्यासाठीं सामान नीट लावून नंतर झोपावे. कंटाळा जरी आला तरी या गोष्टीकडे जरूर लक्ष द्यावे. कारण चोरांचे भय असतें.

( १० ) स्त्रीवर्गानें आपल्या अंगावर बहुमूल्य असे दागिने, अगर उत्तम वस्त्रें बरोबर आणू नयेत. कारण यात्रेत साधूच्या वेषांत पुष्कळदां, चोर, खिसेकापू असण्याचा संभव असतो.

( ११ ) वाटेत चालताना सकाळीं साधारण ८ वाजतां कांहींतरी थोडेसे खाऊन नंतर परत पुढें चालण्यास प्रारंभ करावा.

(१२)–सामानासाठीं हमालाची व्यवस्था हृषिकेषपासूनच करावी. त्याची नोंद रजिस्ट्रर करावी. कंडी अगर दंडी जरी करावयाची झाल्यास त्याची ऑफिसमध्यें नोंद केल्याशिवाय त्यांना बरोबर घेऊं नये. कंडी म्हणजे हमाल. एका माणसांस आपल्या पाठीवर करंडींत घेऊन जातो. आणि दंडी म्हणजे, चार हमाल पाळण्यासारख्या झुल्यांतून खांद्यावरून घेवून जातात.

(१३) मुक्कामासाठीं वाटेत ४–४–६–६ मैलावर चट्ट्या आहेत. आणि १०–१० मैलांवर श्री. बाबाकाली कमलीवाले यांच्या धर्मशाळा आहेत. शिवाय इन्स्पेक्शन बंगले पण आहेत. ज्यांना या बंगल्यांत उतरावयाचें असेल, त्यांनीं ८ डिस्ट्रिक्ट इंजिनियर, पौडी गढवाल ' यांना पत्र पाठवून परवानगी आगाऊ मागून घ्यावी.

(१४) रोज साधारण १० ते १२ मैल तरी चालावे. त्याचप्रमाणें रोज रात्री निजावयाच्या समयी गरम पाण्यांत मीठ घालून पाय शेकावेत. त्यामुळें थकवा कमी होऊन पायांतील जडपणा कमी होतो. आणि नंतर थोडे तेल चोळून झोपावे.

( १५ ) केदारनाथच्या मार्गावर चावणाऱ्या माशा आहेत. त्या पुष्कळदा चावण्याचा संभव असतो. त्या चावल्या तर त्याठिकाणीं ताबडतोब अमृत-धारा चोळल्यास त्रास होत नाही. नाहींतर बारीक बारीक फोड येतात.

(१६) ज्या ठिकाणीं संडास बांधले असतील त्याचठिकाणी शौचास जावे. आणि ज्याठिकाणीं तांबडी निशाणें लावली असतील त्याचेपुढें जाऊं नये. तरीसुद्धा पुष्कळ यात्रिक तिकडे मुद्दाम जातात. लहान लहान हिरव्या पानाची झाडे असतात त्याचा स्पर्श जर अंगास झाला तर खाज सूटून, त्या

ठिकाणीं सूज येवून तो लाल पडतो. व निदान १।२ दिवस तरी त्रास होतो. यासाठीं संडासाच्या बाबतींतला नियम प्रत्येक यात्रिकानें पाळला पाहिजे.

( १७ ) वाटेंत मिळणाऱ्या खाण्याच्या गोष्टी विकत घेऊन खाण्याचे शक्यतो टाळावें, आणि बरोबर असलेल्या सहकाऱ्यांबरोबरच चालावे. पुढे जाण्याची घाई करूं नये. अगर फार मागेही पण राहूं नये. म्हणजे पायी प्रवासांत चुकामूक होत नाहीं. ठराविक मैल चालावयाचे ठरवून तेवढेंच फक्त चालावे. उत्साह वाटतो म्हणून ठरविल्यापेक्षां जास्त चालण्यापासून अतिशय श्रम होऊन त्रास होतो. नियमानें ठराविकच चालावे.

( १८ ) हमालास सामान घेऊन फार पुढें जाऊं देऊं नये. शक्यतों हमाल आपल्याबरोबरच राहील याबद्दल खबरदारी घ्यावी.

## यात्रेंत आवश्यक सामानाची यादी

| अ. नं. | वस्तूंचीं नांवें |
|---|---|
| १ | गरम पांघरुणे प्रत्येक माणसी २ नग, व योग्य कपडे |
| २ | अंथरण्यासाठीं प्रत्येक माणसी १ सतरंजी, १ जाड घोंगडी |
| ३ | गळपट्टा, पायांस बांधण्यासाठीं गरम कापडाच्या पट्ट्या |
| ४ | कॅनव्हासचा बूट व पायमोजे |
| ५ | अर्धा डझन मेणबत्त्या, तीन काडेपेट्या |
| ६ | साबणचुरा १ शेर, साबणवड्या ६ नग |
| ७ | एक लहान बादली |
| ८ | एक ताटली, १ वाटी, १ तांब्या, १ भांडे, २ चमचे |
| ९ | एक छोटासा कंदील, बॅटरी, चाकू, लहान कात्री |
| १० | मेणकापड, (Oil Cloth) २॥ ते ३ वार पावसापासून बचाव करण्यासाठीं |
| ११ | मसाला, तिखट, चटणी, मीठ या वस्तू निदान २० दिवस पुरतील इतक्या बेतानें घ्याव्यात. |
| १२ | बेदाणा, सुंठ, आलेपाक आणि थोडे खाद्यपदार्थ |

साधारण या गोष्टी जरूर असाव्यात.

## औषधी सामान

| अ. नं. | औषधांचीं नांवें |
|---|---|
| (१) | अमृतधारा— १ लहान बाटली |
| (२) | अमृतांजन— १ बाटली |
| (३) | क्लोरिडीन्— १ बाटली (विष आहे) |
| (४) | आयोडिन्— १ बाटली |
| (५) | सुखसारकचूर्ण– १ बाटली (छटाकी) |
| (६) | व्हॅसोलीन— १ बाटली |
| (७) | खोबरेल तेल— अद्पाव |
| (८) | बिब्बे— ५ ते १० नग |
| (९) | बँडेज |
| (१०) | कापूस |
| (११) | कोकम तेल—एक छटाक |
| (१२) | डस्टिंग पावडर (Dusting Power)— अर्धा छटाक |

# —लेखांक आठवा—

## जीवन–यात्रा

जीवन सफल कसें करावे, जीवनांत आनंद निर्माण कसा करावा 'हे ज्या यात्रेंत पूर्णपणें समजते, अनुभव मिळतो, ती बद्रिकेदारची यात्रा म्हणजे एक जीवनयात्राच होय.

केदारनाथ, बद्रिनाथ यात्रा करून येणारे महाराष्ट्रीय या यात्रेब ल 'अत्यंत अवघड यात्रा' 'रेल्वे अगदींच लहान' बर्फाचे खडे अंगांवर पडले'

वगैरे गोष्टी इतर लोकांना मी सांगतांना पाहिलें. खरोखरच माझ्या मनाला हे सारे ऐकून खेद झाला. पायीं प्रवास करावा लागतो.म्हणून अवघड यात्रा. त्यांत रस्ते अगदींच लहान! या सार्‍या गोष्टी माणूस एकदम विसरूनच जातो. कारण निसर्ग हा त्याच्या मनावर आपल्या सौंदर्याची छाप अशी कांहीं जबर पाडतो कीं जाणार्‍या प्रत्येक यात्रिकास एक प्रकारचें सात्विक राजस असें नवीन सुख आनंदण्यास मिळते, पण मन आणि दृष्टि त्या निसर्गात एकरूप झाली पाहिजे. पैशाच्या दृष्टीनें जर विचार करावयाचा झाला तरीसुद्धां मी असेच म्हणेन कीं, गरीबांतला गरीब ही यात्रा आपल्या आयुष्यांत सहजगत्या घडवून आणील! पण जाऊन येणारे लोक अशा कांहीं अफवा पिकवितात कीं, जावयास निघालेले लोक जाण्याचा बेत रद्द करून हरद्वार करूनच परत येतात. ही उदाहरणें मी प्रत्यक्ष पाहिली आहेत. आमच्याबरोबरच एक श्री. खेडकर नांवाचे गृहस्थ यात्रेला यावयाचे होते, ते हरद्वारपर्यन्त आले आणि कोणी जाऊन आलेल्या महाराष्ट्रीय लोकांनीं त्यांच्या मनावर असा कांहीं परिणाम केला आणि ही यात्रा आम्हीं कशीबशी पार पाडून आलो. आमचे नशीबच थोर. इत्यादि सांगून त्या गृहस्थाचें हात-पाय पार गाळून टाकले.

बिचारा तेथूनच परत गेला. बद्रिनाथाने त्याला बोलाविलें नव्हतें. अशी कमकुवत आणि दुसर्‍याच्या बोलण्यावर विश्वासून आपल्या ठरलेल्या कार्यांत खंड करणारी माणसे जोपर्यन्त आहेत, तोपर्यन्त आपली मानसिक, सामाजिक, वैचारिक उन्नति होणे कठिणच आहे असें मला वाटते. धडाडी ही बाळगलीच पाहिजे. या यात्रेमुळें माणसाच्या अंगांत नवउत्साह, जोम, धडाडी आणि अंगांतील अभिमानाचा ताठा नाहींसा होऊन, स्वावलंबी आणि दया, क्षमा, विचारबुद्धि निर्माण होते. अितके अनुभव आणि शिक्षण गेलेला यात्रिक अगदी आपोआप सहजगत्या घेत असतो, म्हणूनच ही यात्रा थोर! मनाची तयारी असल्यावर ही यात्रा अवघड नाहीं. अखिल भारतांतून याठिकाणीं अनेकविध लोक जमून त्या बद्रि–नारायणाची पूजा करतात आणि तो बद्रि विशाल पण यात्रिकांना प्रसन्न होऊन त्यांनीच निर्माण केलेल्या जगांत तुम्हीं वावरा, पण माझ्या पायाशी असा, मग तुम्हांला कसलाच त्रास होणार नाहीं, असा संदेश देवून या यात्रिकाला निर्भय करतो. संसार सागराची भीति तुला

कशाला ? बेधडक त्यांतून तू पैलतीराला जाशील असा संदेश तो निसर्गरूपी बद्रिविशाल प्रत्येकाला देत असतो, पण त्याकडे पाहातो कोण ?

## सर्वसाधारण खर्चाचा आढावा

| | रु. आ. पै |
|---|---|
| रेल्वेभाडे | ८५—०—० |
| मोटारभाडे | २०—०—० |
| हमाली | ७५—०—० |
| शिधा-खर्च | २५—०—० |
| धर्मादाय | २५—०—० |
| अितर | २०—०—० |
| | रु. २५०—०—० |

( प्रत्येक माणशी सामान २५ ते ३० शेरापर्यन्त नेल्यास. )

हाच खर्च प्रत्येक माणसी कमीतकमी तरी लागतोच, आणि दंडी, कंडी केल्यास त्याचा खर्च अलग असतो. पण काटकसरीने जर खर्च केला, तर माझ्या मतें २५०—०—० रुपये एका माणसास सहज पुरतील. पैसा ही चीज अशी आहे कीं कितीही खर्च केला तरी तो कमींच वाटतो. आपल्या ऐपती-प्रमाणेंच आपण खर्च करावा हे फार छान, आणि सहज पटणारें असें आहे.

आतां कांहीं तिकडील प्रचलित शब्दांचा परिचय करून देतो.

( १ ) **चट्टी**—पायी प्रवासास सुरुवात केल्यावर आपण ज्या ठिकाणी वाटेत उतरून मुक्काम करतो, त्यास 'चट्टी' संबोधतात ! या ठिकाणीं यात्रिकांच्यासाठीं दुकाने आणि घरें बनविलेली असतात.

( २ ) **पहाडतरफ**—ज्या वेळीं यात्रेकरू पायी प्रवास करीत असतात, त्यावेळी रस्त्यानें दंडीवाले लोक, म्हणजे चार माणसें एका माणसाला झुल्यांतून नेत असतात, ते त्यांच्या संवयीप्रमाणें भराभर चालत असता, आणि चालतांना 'पहाडतरफ, बगल हो जाव' असे मोठ्यानें पुकारतात. त्यावेळीं ते दंडीवाले हमाल जवळून जात असतां यात्रेकरूंनी डोंगराच्याकडेला व्हावे, यासाठींच ते पुकारीत असतात. कारण दुसऱ्या बाजूला खोल दऱ्या असतात. त्यांचा धक्का लागू नये म्हणून हा 'पुकार' ते करीत चालतात.

**( ३ ) पंचकेदारी**—ज्यावेळीं आपण हमाल करतो, त्यावेळीं पंच-केदारी म्हणजे ‘ गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बद्रिनाथ व तुंगनाथ ’ या यात्रा करणार काय ? या पांच ठिकाणाला ‘ पंचकेदारी ’ म्हणून संबोधतात.

**( ४ ) पंचकेदार**—वरीलप्रमाणेंच फक्त केदारनाथ, मध्यमहेश्वर, तुंगनाथ, रुद्रनाथ, कल्पेश्वर, आणि बद्रिनाथ या यात्रा पण त्यांतच मोडतात. याला ‘ पंच केदार ’ म्हणून ते हमाल संबोधतात.

**( ५ ) तीर्थ मुक्काम**—केदारनाथ, बद्रिनाथ आदि प्रमुख ठिकाणीं गेल्यावर हमाल लोक अिनाम अगर भोजनाचा खर्च मागतात. हे द्यावयाचें किंवा नाहीं याचा उहापोह हमाल करतेवेळींच करावा अगर आपली इच्छा असल्यास त्यास योग्य ते अिनाम अगर भोजन द्यावे.

**( ६ ) गीली और सूखी**—ज्यावेळीं आपण हृषिकेश, अगर अन्य ठिकाणीं हमाल करतो, त्यावेळी त्याची हमाली आपण ठरवितो. ठरविताना तो हमाल ‘ मजदूरी गीली होगी या सूखी होगी ’ म्हणून विचारतो. म्हणजे हमालीचे पैसे देऊन शिवाय त्यांस रोज एकवेळ जेवण देणें याला ‘ गीली मजदूरी ’ आणि फक्त हमालीच देऊन भोजनाचा प्रबंध हमालाचा हमालानेच करावा याला ‘ सूखी मजदूरी ’ म्हणतात. हें ठरवितांना पुष्कळदां न समजल्यामुळें हमालाशीं भांडणाचा प्रसंग येतो. म्हणून हमालाची नोंद करतांना या सार्‍या गोष्टींचा उलगडा व्यवस्थित करून घ्यावा. त्याला हमाली देऊन जेवण देणें अगर न देणें हें यात्रेकरूंच्या मनावर आहे. तरी-सुद्धा त्याला ‘ जेवण मिळेल ’ असा ठराव करूं नये हे चांगलें. उरलेलें अन्न त्यालाच मिळतें.

**(७) चना चबेना**—हमालीच्या पैशाशिवाय हमालांस दररोज एक आणा त्याला खर्चावियास देणें अगर त्याला रोज १ आण्याचे चणे खावयांस घेवून देणें याला ‘ चना चबेना ’ असें म्हणतात. हा ठरावसुद्धा यात्रिकाचें मनावरच अवलंबून असतो. याचाही पण उलगडा आधीच केलेला असला म्हणजे हमालांस बोलण्यास जागा राहात नाही.

**(८) न देना, मत लेना**—वाटेंत पुष्कळजण अनेक प्रकारची औषधे विकण्यांस येतात. पण त्यांचेजवळून यात्रिकांनी कांहींही खरेदी करू नये. सरकारी दवाखान्यांत जावून तेथील औषधोपचार करावेत. पुष्कळ साधु, बैरागी एकसारखी भीक, अन्न, कपडे आदि गोष्टीसाठीं मागे लागतात. त्यांना जर प्रत्येक जण कांहींना कांहीं तरी द्यावयास लागेल तर तो घरीं परत रिकाम्या हातानेंच येईल. दानधर्म हा योग्य ठिकाणींच करावा. पुष्कळजण तीर्थप्रसाद आदि गोष्टी आणून देतात. तीर्थ डोळ्याला लावावे आणि प्रसाद ठेवून द्यावा, खावू नये, यालाच ' न देना, मत लेना ' म्हणून संबोधितात. पुष्कळ ठिकाणीं अशा पाट्या आहेत. नुसत्या शब्दावरून अर्थ समजत नाही, म्हणून हा उलगडा मी करून घेतला. जाणाऱ्या प्रत्येक यात्रिकाला यापासून नक्कीच फायदा होईल असे मला वाटते.

## मोटार मार्ग

हरिद्वार ते हृषिकेश–मैल–१६, हृषिकेश ते देवप्रयाग–मैल–४४, देवप्रयाग ते कीर्तिनगर-मैल–२०, कीर्तिनगर ते श्रीनगर मैल ३, (पायीप्रवास) श्रीनगर ते रुद्रप्रयाग मैल १८ मोटार, आणि रूद्रप्रयागाहून केदारनाथला पायीं प्रवासांस सुरवात होते. रूद्रप्रयागाहून केदारनाथ त्रियुगि–नारायणासहित ५४ मैल आहे. आणि केदारनाथाहून बद्रिनारायण ११०॥ मैल आहे. हा सारा पायी प्रवास आणि बद्रिनाथ ते पीपलकोटीपर्यंत ३९ मैल पायी आल्यावर मोटार मार्ग परत सुरू होतो.

पीपलकोटी ते श्रीनगर मोटारनें येऊन नंतर पुढें कीर्तिनगर मार्गे हृषिकेशला परत येतां येते अगर पीपलकोटीहून मोटारनें कोटद्वारला जातां येतें आणि कोटद्वारहून रेल्वेनें हरद्वारला जातां येते, ज्याला जो सोयीचा मार्ग पडेल त्यानें तो अवलंबावा.

शक्य तितकी माहिती मी वाचकांना दिली आहे. ही यात्रा अवघड नाहीं. आतां पुष्कळशा सोयी होत आहेत आणि झाल्याही पण आहेत. नियमित पायी प्रवास, नियमित आहार आणि सावधगिरी बाळगली तर त्रास बिलकूल होणार नाहीं. आयुष्यांत एकदां तरी अशी ही बद्रि–केदारची यात्रा जरूर करून त्या परमेश्वरानें निर्माण केलेल्या निसर्गाचे दर्शन घेऊन आनंद मिळवावा आणि तो आनंद प्रत्येक यात्रिकाला मिळतोच ! ईश्वरानें मानवावर

संसाररूपी जाळे टाकले आहे. त्यांत जरी देह गुरफटला तरी मन मात्र शक्य तो त्यांत अडकू देऊ नये, म्हणजे तें जाळे मानवाच्या उद्धारासाठींच आहे असे आपोआप दिसून येईल. जाळे टाकणाराच्या पायांत जाळें नसते, म्हणून त्याच्या पायाशी गेल्यावर जाळयांत अडकण्याचा प्रसंगच येणार नाहीं, म्हणूनच त्या सर्वश्रेष्ठ सर्वशक्तिमान अशा बद्रिनाथाच्या पायापाशी लीन बुद्धीनें गेले पाहिजे. तोच जीवन यशस्वी करण्याचा मार्ग दाखवील आणि जन्म–मरणाच्या फेऱ्यातून तारून नेईल. फक्त त्याच्या पायाशी जाण्यासाठीं भक्ति, आणि दृढनिश्चय जवळ बाळगून जनसेवा, सत्कार्य, करीत आपले विचार आणि मन हे चांगल्या मार्गावर प्रथम लाविले पाहिजेत. हे सारे त्या बद्रिविशालानें शिकविले, त्या निसर्गानें शिकविले, ईश्वराचाच सारा हा खेळ आहे. जास्तीतजास्त माहिती मिळवून मी ती वाचकांच्या पुढें मांडण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या हातून जे कांहीं चांगले लिहिले गेले, तें सारे त्या बद्रिविशालाकडून मिळाले.. आणि जे वाईट आणि ज्या चुका त्या मात्र साऱ्या माझ्याच आहेत.

'सुखी सारे असावेत, निरोगी सर्वहि तसें सर्वांचे चांगले होवो, न होवो दुःख ते कुणा' हीच त्या विधात्याजवळ प्रार्थना ! ! !

अनुक्रम ९.८०८३
विभाग २५:३२.४
क्र. १९
नों. दि. २०/१२/५४

समाप्त

# पायीं–प्रवास–सूचिपत्र

## रूद्रप्रयाग ते केदारनाथ ५४ मैल (त्रियुगी नारायणासहित)

| चट्टी | मैल |
|---|---|
| छतौली | ४॥। |
| रामपूर | २। |
| अगस्तीमुनी (सरकारी दवाखाना) | ३॥। |
| सौडी | २। |
| चंद्रापुरी | २ |
| भिरी (पोस्ट ऑफिस) | ३। |
| कुंड | ३॥। |
| गुप्तकाशी (पोस्ट, ऑ. सरकारी दवाखाना) | २ |
| नाला | १ |
| भेत | १ |
| व्यूंग | २ |
| महिषासुर मर्दिनी | १॥ |
| फाटा (पोस्ट, ऑ. सरकारी दवाखाना) | १॥ |
| बदलपूर | ३। |
| रामपूर | १॥। |
| त्रियुगी नारायण (सरकारी दवाखाना) | ५ |
| गौरीकुंड | ५ |
| जंगल | २ |
| रामबाडा | १॥ |
| केदारनाथ (पोस्ट, ऑ सरकारी दवाखाना) | ३॥ |

## केदारनाथ ते बद्रिनाथ ११०॥ मैल

केदारनाथाहून परतल्यावर नालाचट्टीपर्यंत २३ मैल अंतर गेलेल्याच रस्त्यानें परत यावें लागतें व नंतर नालाचट्टीपासून दुसरा रस्ता बद्रिनाथाकडे कळतो.

| चट्टी | मैल |
|---|---|
| नाला | २३ |
| उखीमठ ( पोस्ट ऑ. सरकारी दवाखाना ) | २॥ |
| ग्वालबगड | ३। |
| दौडा | १॥। |
| कथ्था | १ |
| पोथीवासा | २॥ |
| बनियाकुंड ( सरकारी दवाखाना ) | २ |
| चौपत्ता | १। |
| तुंगनाथ | ३ |
| भुल्कना | ३ |
| पांगरवासा | २॥। |
| मंडल (सरकारी दवाखाना ) | ३। |
| सेठाणा | ४। |
| गोपेश्वर ( पोस्ट ऑ. सरकारी दवाखाना ) | ६ |
| चमोली ( पोस्ट ऑ. सरकारी दवाखाना ) | ३ |
| मठ | ५ |
| सियासैन | ४ |
| पिपल कोटी ( पोस्ट ऑ. सरकारी दवाखाना ) | ३ |
| गरूडगंगा | ४ |
| टाँगनी | २ |
| गुलाबकोटी | २॥ |
| कुमार ( हेलंग ) ( सरकारी दवाखाना ) | २॥। |

| चट्टी | मैल |
|---|---|
| भरकुला | ४॥ |
| जोशीमठ ( पोस्ट ऑ. सरकारी दवाखाना ) | ३ |
| विष्णूप्रयाग | २ |
| घाट | ४ |
| पांडुकेश्वर ( सरकारी दवाखाना ) | २ |
| लामबगड | ३ |
| हनुमान | ३ |
| बद्रिनाथधाम ( पोस्ट ऑ. सरकारी दवाखाना ) | ५ |

बद्रिनाथाहून वसुधारेस जाण्यासाठीं दुपारीं १२॥ नंतर निघावे. खाण्याचे डबे बरोबर न्यावेत. फराळ उरकून, ६ चेआंत बद्रिनाथास परत येतां येईल. याबद्दलची खबरदारी घ्यावी. बद्रिनाथ ते पिपलकोटी परत त्याच रस्त्यानें येवून नंतर पिपलकोटीहून मोटारी मिळतात, बद्रिनाथ ते पिपलकोटी अंतर ३९ मैल आहे.

रूद्रप्रयाग ते केदारनाथ ५४ मैल
केदारनाथ ते बद्रिनाथ ११०॥ मैल
बद्रिनाथ ते ळ ( जाऊनयेवून )
बद्रिनाथ ते ळ
ळ पायी प्रवास.

REFBK-0008138
REFBK-0008138
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
ग्रंथ संग्रहालय
C93C
क्र.